शनिवार
२१ एप्रिल
१९७९
७५ पैसे

# माणूस

कामगारदिनाच्या सुट्टीच्या दिवशी आमची मुले ड्रम व बिगुल यांच्या तालावर शहराकडे कूच करीत. शहरातील लोक व प्रतिष्ठित शिक्षणतज्ज्ञ आमची ही पोलादी शिस्त व लयबद्ध चाल यांचे कौतुक करीत. आम्ही नेहमी सगळ्यांच्या शेवटी चौकामध्ये पोचत असू व हात उंच करून बिगुलाच्या आवाजात शहरातल्या कामगारांना सलामी देत असू.....

असेच आम्ही एक दिवस आमचा बावटा घेऊन, शिस्तीने, ड्रम व बिगुलाच्या तालात, पथकापथकाने गॉर्की कॉलनीतून बाहेर पडलो.....

सगळे गावकरी आम्हाला बघण्यासाठी जमा झाले होते....

नव्या आयुष्यात प्रवेश करण्यासाठी...

## गॉर्की कॉलनी

(अखेरची दोन प्रकरणे : पृष्ठ ८)

संघ विधानसभेत समजावून सांगता आला
म्हणून जनसंघाला

संघावर प्रच्छन्न टीका करता आली
म्हणून इंदिरावाद्यांना

संघबंदीला विरोध करताना मध्यममार्ग निवडता आला
म्हणून समाजवाद्यांना

आणि संघाच्या काठीने काँग्रेस (आय)मधील
एकाधिकारशाहीला झोडपता आले
म्हणून मुख्यमंत्र्यांना–

सर्वांनाच ही चर्चा सोयीची ठरली.

# संघबंदी/चर्चा



**साप्ताहिक माणूस**

वर्ष अठरावे–अंक सत्तेचाळीसावा

२१ एप्रिल १९७९

मूल्य ७५ पैसे

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक

**दिलीप माजगावकर**

**सौ. निर्मला पुरंदरे**

¤

वार्षिक वर्गणी :

**चाळीस रुपये**

¤



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४ ३४ ५९

¤


# संघबंदी

## विधानसभेत रंगलेली मनमोकळी चर्चा

विनय सहस्रबुद्धे

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व त्यावरून जनता पक्षात सुरू असलेले वादंग हा आता पुरेसा कंटाळवाणा व नीरस विषय बनला आहे. आरोप करणाऱ्यांचे आरोप नवीन नाहीत व मधूनमधून संघनेते या आरोपांना जी उत्तरे देतात त्यातही स्वाभाविकत:च काहीही नाविन्य नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व त्याच्या विचारप्रणालीशी वैचारिक लढा वगैरे देण्याची भाषा करणारी ही मंडळी मुळात ही चर्चा उघडपणे राजकीय भावनेतून करतात; परिणामत: त्या चर्चेला शिवराळ वादंगाचेच स्वरूप उरते.

अशा या वातावरणात 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या कवायतींवर बंदी घालण्यात यावी,' या माजी अर्थमंत्री यशवंतराव मोहिते यांच्या ठरावावर विधानसभा अधिवेशनाच्या अखेरच्या दिवशी साडेपाच तास प्रदीर्घ, मनमोकळी आणि बऱ्यापैकी वैचारिक पातळीवरून जी चर्चा घडून आली ती उल्लेखनीय आहे. ही चर्चा समाधानकारक झाली असे म्हणण्याचे आणखी एक कारण म्हणजे, त्या चर्चेचे इतिवृत्त वाचल्यानंतर रा. स्व. संघाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या एका सदस्याने 'ही चर्चा म्हणजे न ठरविता घडून आलेला एक चांगला उपक्रम' अशा शब्दांत तिचे स्वागत केले आहे.

शनिवार दि. ७ एप्रिल रोजी झालेल्या या चर्चेसाठी यशवंतराव मोहिते यांनी पाठविलेला प्रस्ताव अंतिम आठवडा ठराव म्हणून सभापतींनी दाखल करून घेतला होता. (अंतिम आठवडा प्रस्तावावर केवळ चर्चा घडवून आणता येते, मतदान होत नाही.) शनिवारी दुपारी ठीक साडेतीन वाजता या अशासकीय ठरावावरील चर्चेला सुरुवात झाली. या ठरावाच्या प्रतीक्षेत असलेले वार्ताहर घाईगर्दीने वार्ताहर-कक्षेत येऊन दाखल झाले. नेहमीपेक्षा मोठ्या संख्येने वार्ताहर हजर होते! 'मुंबई सकाळ'कार माधवराव गडकरीही जातीने उपस्थित होते. प्रेक्षकांच्या सज्ज्यातही अनेक विधान परिषद सदस्यांनी गर्दी केली होती. राज्य जनता पक्षाचे सरचिटणीस वसंतराव भागवत हेही हजर होते.

प्रस्ताव मांडताना आपल्या भाषणात मोहिते यांनी स्वातंत्र्योत्तर काळात भारताने जपलेल्या तत्त्वांचा आढावा घेतला. ते म्हणाले की, 'नवभारताची उभारणी, लोकशाही, सहजीवन, धर्मनिरपेक्षता व समाजवाद या चार प्रमुख तत्त्वांच्या आधारावर झाली आहे. ह्या देशातील कोणत्याही विचारी व सुबुद्ध व्यक्तीला ही चारही तत्त्वे मान्य आहेत व प्रत्येकजण ह्या तत्त्वांच्या जोपासनेस सहकार्य करीत आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला ही चारही मूलभूत तत्त्वे अमान्य आहेत. संघाचा या अत्यंत मूलभूत तत्त्वांनाच विरोध असल्यामुळे देशाच्या सर्वांगीण विकासात संघ हा एक मोठाच अडसर आहे.'

संघाला लोकशाही मान्य नाही हे स्पष्ट करताना ते म्हणाले, 'संघाचे सारे निर्णय गुप्त पद्धतीने घेतले जातात. वरिष्ठ नेते कुणाशी विचारविनिमय करून निर्णय घेतात व कशाच्या आधारावर निर्णय घेतात हे समजू शकत नाही. संघात चर्चेला अजिबात स्थान नाही ही एकच गोष्ट संघाला लोकशाही अमान्य असल्याचे दर्शविते.' संघाला धर्मनिरपेक्षता मान्य नाही असे सांगून आ. मोहिते पुढे म्हणाले की, या देशातील निकोप सहजीवनाला 'संघ' हा एक मोठा धोका आहे. संघ आपल्या सर्व ताकदीनिशी या देशातील जीवनपद्धतीला एक धार्मिक चौकट देण्याचा प्रयत्न करीत आहे. विद्यार्थी परिषदेपासून हिंदू सेवा समितीपर्यंत आपल्या अनेक संघटनांच्या द्वारे संघ या देशाला एक हिंदू राष्ट्र बनवू पहात आहे. संघाने सर्व क्षेत्रांत आपली माणसे घुसविली व राजकीय क्षेत्रात आपली तैनाती फौज असावी म्हणून संघानेच जनसंघाची स्थापना केली होती. मी हे विधान जाणीवपूर्वक करीत असून त्याला कुणाचा आक्षेप असल्यास त्याने सांगावे!' असे आव्हान मोहित्यांनी दिले. त्यावरोबर आ. अरविंद लेले यांनी 'मोहित्यांचे अज्ञान हे आमचे ज्ञान प्रकट करण्याची संधी होऊ शकत नाही. आमची बाजू मांडताना आम्ही या आरोपाचा समाचार घेऊ!' असे स्पष्ट उत्तर दिले.

यशवंतराव मोहिते यांनी आपल्या भाषणाच्या अखेरीस संघाला सरंजामशाहीचे पुनरुज्जीवन अभिप्रेत आहे, असा आरोप केला. 'संघाकडे आर्थिक समस्यांवर निश्चित उत्तरे नाहीत, नुसती मलमपट्टी आहे,' असे सांगून ते म्हणाले की, 'संघाविरुद्ध वैचारिक लढा द्यावा अशी भूमिका अनेकजण मांडतात व ती योग्यच आहे; परंतु संघ 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' म्हणून अशा खुल्या वैचारिक चर्चेसाठी समोर येत नाही. संघ दडून रहातो व जनसंघासारखे संघाचे समर्थक समोर येतात ही आमची खरी समस्या आहे.'

'संघाच्या कवायतींवर बंदी घालून संघविचारांचा मुकाबला होणार नाही हे मला ठाऊक आहे! परंतु संघाविरुद्ध एक मामुली कारवाई तरी जरूर व्हावी या हेतूनेच सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या रा. स्व. संघाच्या कवायतींवर बंदी घालण्याची मागणी मी प्रस्तावात केली आहे.'

मोहित्यांच्या ठराव मांडण्यासाठी झालेल्या भाषणानंतर मुंबईच्या आ. सौ. जयवंतीबेन मेहता यांचे भाषण झाले. या ठरावाच्या निमित्ताने संघाबद्दल चर्चा घडवून आणली याबद्दल आपण श्री. मोहित्यांच्या आभारी आहोत असे सांगून त्या म्हणाल्या, 'संघ ही एक अ-राजकीय सांस्कृतिक संघटना आहे व चारित्र्यवान व शिस्तबद्ध तरुणांची राष्ट्राची गरज संघ भागवीत आहे.' संघाचा व राजकारणाचा काहीही संबंध नाही हे स्पष्ट करताना त्या म्हणाल्या, 'संघात सात-आठ वर्षांची लहान मुले शाखांवर येतात ती काय राजकारण खेळण्यासाठी? त्या मुलांना राजकारण ते काय कळणार?' आ. मेहता यांनी संघावर बंदी घालण्याची मागणी राजकीय हेतूतून पुढे आली आहे, असा आरोप केला. संघाचा लोकशाहीवर विश्वास आहे हे सांगताना त्या म्हणाल्या की, 'संघाने आणीबाणीशी यशस्वी टक्कर दिली होती व आज लोकशाहीची भाषा करणारे मोहिते त्या वेळी आणीबाणीचे समर्थन करीत होते.'

सौ. जयवंतीबेन मेहता यांच्या छोटयाशा भाषणानंतर विरोधी पक्षनेत्या श्रीमती प्रभा राव यांनी मोहित्यांच्या ठरावाला पाठिंबा देणारे भाषण केले. श्रीमती राव म्हणाल्या की, 'संघासारख्या देशाला घातक अशा प्रवृत्तींच्याच ताकदीवर आज केंद्रात व अनेक राज्यांतही सरकारे तग धरून आहेत. यामुळे संघाला राजाश्रय मिळत आहे व हे चिंताजनक आहे'.

श्रीमती राव यांनी आपल्या भाषणात मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री संकलेचा यांच्यावरील आरोपांबाबत काही विधाने केली; परंतु आ. राम नाईक यांनी हरकत घेतल्यानंतर सभापती शिवराज पाटील यांनी ही विधाने कामकाजातून काढून टाकण्याचा आदेश दिला.

श्रीमती राव यांनी आपल्या भाषणात संघ हिंसक कारवायात रस घेतो, असे सांगून अलिगढ दंगलीशी संघाचा संबंध आहे हे सांगणारा अहवाल संघानेच दडपला असल्याचा आरोप केला. श्रीमती जयवंतीबेन मेहतांच्या भाषणाचा उल्लेख करून त्या म्हणाल्या की, 'शाखेवर जाणाऱ्या भोळ्याभाबड्या मुलांना राजकारण समजत नाही हीच खरे तर एक मोठी अडचण आहे'.

त्यानंतर बोलावयास उभे राहिले कुर्ल्याचे आमदार शमसूल हक खान (जनता). संघबंदीच्या ठरावाला विरोध करताना श्री. खान म्हणाले की, 'संघाची बाजू घेण्यासाठी एक मुसलमान पुढे येतो याचे विरोधकांना दुःख वाटत असेल; परंतु संघ ही केवळ एक संघटना नसून तो एक विचार आहे असे मी मानतो. 'आपण जिथे रहातो त्या लोकांमध्ये सामावून जा!' असा पवित्र कुराणाचा आदेश आहे व त्यानुसार भारतातील सर्व मुस्लीम बांधव व अन्य धर्मीयही हिंदुस्थानी आहेत. रा. स्व. संघानेही हाच विचार मांडला आहे'. संघाच्या शाखा ही संस्कारकेंद्रे आहेत असे सांगून श्री. खान यांनी अनेक मुस्लिम बांधव रोज शाखांवर जातात असे सांगितले. आतापर्यंतच्या एकाही जातीय दंग्यात रा. स्व. संघाचा हात नसल्याचे न्यायालयीन आयोगांनी सिद्ध केले आहे व म्हणून संघाला जातीयवादी म्हणणे गैर आहे, असेही ते म्हणाले.

श्री. खान यांच्यानंतर आमदार श्री. नानासाहेब एबंडवार पाटील (कॉं. इंदिरा) यांचे भाषण झाले. सभागृहाला 'प्रणाम' करून श्री. एबंडवार यांनी भाषण सुरू केले.

श्री. एबंडवार यांनी सुरुवातीलाच संघातील एकाधिकारशाही

---

□ मुख्यमंत्री शरद पवार यांनी आपल्या भाषणात कॉंग्रेसमध्ये कमलापती त्रिपाठींच्या पायाला हात लावून नमस्कार करण्याची 'ब्राह्मण्यवादी' पद्धत कशी होती ते विस्ताराने सांगितले. मुख्यमंत्री म्हणाले की, आत्ताच राज्य इंदिरा कॉंग्रेसच्या अध्यक्षपदी अ ऐवजी ब व्यक्ती नेमण्यात आली आहे. हे सारे वरून आदेश येण्याच्या फॅसिस्ट प्रवृत्तीतून झाले असता इथे सभागृहात इतरांच्या फॅसिझमच्या उठाठेवींची चर्चा करण्यात अर्थ कोणता?

---

कशी आहे हे स्पष्ट करून सरसंघचालकपदी हेडगेवारांनंतर गोळवलकरगुरुजींची निवड कशी झाली याबद्दल एक दंतकथा ऐकविली. आपल्या भाषणात श्री. एंबडवार यांनी संघाच्या मंडळींनीच महात्मा गांधींचा खून केला असा आरोप केला. संघ जातीयवादी कसा आहे हे सांगताना श्री. एंबडवार म्हणाले की, 'संघाला फक्त ब्राह्मणांचे वर्चस्व मान्य आहे; परंतु सगळेच ब्राह्मण संघाला चालत नाहीत'. 'आमचे भाई वैद्य किंवा कुमार सप्तर्षी संघाला चालत नाहीत, असे विधान श्री. एंबडवार करतात तोच आ. राम कापसे यांनी 'कुमार पंधरा वर्षे संघात, शाखेवर जात होता, असे सांगितले. त्यावर लगेचच उठून डॉ. सप्तर्षी म्हणाले, 'मी संघात जात होतो हे खरे; पण मी वयात आल्यावर संघ सोडला.' आ. सप्तर्षींच्या उद्गारावर सभागृहात एकच हशा पिकला. त्यानंतर जयवंतीबेन मेहता यांनी उठून सांगितले, 'सप्तर्षींनी संघाला सोडले आहे; पण संघाने सप्तर्षींना सोडलेले नाही.'

श्रीमती मेहता यांच्या विधानाचा संदर्भ घेऊन आ. एंबडवार पुढे म्हणाले की, संघ एकदा माणसे धरली की सोडतच नाही. श्री. एबंडवार यांनी आरोप केला की, 'संघाने जनता पक्ष काबीज करण्याचे प्रयत्न चालविले आहेत! जनता पक्ष व जनसंघ यांच्या नावातही फारसा फरक नाही व पक्षाचा ध्वजही फारसा बदललेला नाही. 'राज्यकर्त्यांनी आपल्या मेहरबानीवर आपल्या पायाला हात लावून मगच सिंहासनावर चढावे असा संघवाल्यांचा आग्रह असतो व या संघाच्या प्रवृत्तीची दोन उदाहरणे म्हणजे उद्या मुख्यमंत्री होऊ पहाणारे राजारामबापू पाटील व आज जनता पक्षाध्यक्ष झालेले बबनराव ढाकणे.'

श्री. एंबडवार यांच्यानंतर जनता पक्षाचे आमदार वासुदेवराव देशमुख यांचे भाषण झाले. ते म्हणाले की, 'संघाचे व माझे मतभेद आहेत; परंतु संघाशी वैचारिक लढाच योग्य आहे असे मला वाटते. आज देशात संघाबाबत वैचारिक मंथन सुरू असताना मोहिते यांनी शुद्ध राजकीय हेतूने हा ठराव विधानसभेत आणल्यामुळे संघाशी सुरू असलेल्या वैचारिक संघर्षाची धार बोथट झाली आहे. हा ठराव या सभागृहात आणताना त्या निमित्ताने जनता पक्षात फूट पाडावी असाच अंतस्थ हेतू मोहित्यांच्या मनात आहे. या ठरावामुळे संघविचारांचा मुकाबला होणार नाही, उलट संघाला या ठरावाचा फायदाच होईल!'

आ. देशमुख पुढे म्हणाले, 'संघाला मोहित्यांचा खराच विरोध आहे तर मग त्यांनी स्वतः तीस वर्षे सत्तेवर असताना संघावर बंदी का आणली नाही? तीस वर्षांच्या राजवटीत संघ जोपासला गेला व त्यात मोहित्यांचाही वाटा होता.'

बंदीला आपला विरोध असल्याचे सांगून श्री. देशमुख म्हणाले की,'युक्रान्द, सेवा दल या संस्थात माणसे टिकत नाहीत व संघात मात्र ती टिकतात या गोष्टीचा मोहित्यांनी विचार करायला हवा. एका विशिष्ट निष्ठेने रा. स्व. संघात माणसे जातात व संघ त्यांना चारित्र्यवान नागरिक बनवितो. आजच्या राजकीय जीवनात भ्रष्टाचार बोकाळला असताना व बहुतेक राजकीय पक्षातील तुम्ही-आम्ही आपल्या सामाजिक जीवनात कंगाल झालेलो असताना संघाने जर सच्चारित्र व देशभक्त माणसे उभी केली तर समाज त्यांच्याच मागे जाणार,' असे सांगून आ. देशमुख यांनी आपले भाषण संपविले.

श्री. देशमुख यांच्यानंतर कॉंग्रेस (इंदिरा)चे श्री. ईश्वरलाल जैन यांनी संघबंदीच्या ठरावाला पाठिंबा देणारे भाषण केले. संघकार्यकर्ते फक्त आज्ञाबरहुकूम कामे करतात. त्यामुळे संघात लोकशाही नाही हे सिद्धच होते, असे ते म्हणाले.

श्री. जैन यांच्यानंतर जनता पक्षाचे आमदार गुलाबराव पाटील यांचे भाषण झाले. सुरुवातीलाच 'यशवंतराव मोहित्यां'चा हा ठराव पराभूत मनोवृत्तीतून पुढे आला आहे. सरकार पाडण्याचे सर्व प्रयत्न फसल्यानंतर यशवंतराव मोहित्यांनी हा प्रयत्न करून पहाण्याचे ठरविले,' असे सांगून गुलाबराव पुढे म्हणाले की, 'संघ किती प्रतिगामी आहे हे मला पुरते ठाऊक आहे. मोहित्यांनी फक्त संघाचा एक उत्सव बघितला आहे. मी १९ महिने जेलमध्ये संघवाल्यांबरोबर होतो! एका वटवाघळाला गंमत म्हणून राखी बांधल्याबरोबर ह्या प्रतिगामी मंडळींचे कसे पित्त खवळते ते मला चांगले ठाऊक आहे. संघाची ही प्रतिगामी बाजू १९ महिन्यांतील अनेक प्रसंगांनी माझ्यापुढे स्पष्ट केली आहे.

'परंतु तरीही माझा संघाच्या कवायतीवरील बंदीला विरोध आहे. बंदी घालून संघावर उपकारच होणार आहेत. १९४८ मध्ये संघबंदी आली. त्यानंतर संघाचा जनसंघ होऊन त्यांची ताकद वाढली. परवा आणीबाणीत संघबंदी आली तर जनसंघाचा जनता पक्ष होऊन संघवाले राज्यारूढ झाले, तेव्हा आणखी एकदा बंदी घालून संघाची ताकद वाढवू नका!'

गुलाबराव पुढे म्हणाले, 'संघाचे व्यवहार गुप्त चालतात म्हणून मोहिते तक्रार करतात; पण मग कवायतींवर बंदी कशासाठी? हे थोडे उघडयावर चालले आहे ते बंद कशासाठी करता? मोहितेसाहेब, संघाच्या अनेक संघटना असल्याचे तुम्ही इथे सांगितलेत; पण त्यांनी संघटना बांधल्या, तशा तुम्हाला का नाही बांधता आल्या? तीस वर्षे सत्तेवर राहूनही तुम्हाला जमले नाही. म्हणूनच तुमचा संघावरचा राग म्हणजे निपुत्रीने सुपुत्रीवर आग पाखडण्यासारखे आहे!

'मी कट्टर समाजवादी व संघविरोधी आहे! पण संघाचे कार्यही मी जवळून पाहिले आहे. जेव्हा जेव्हा देश संकटात आला तेव्हा तेव्हा संघ-स्वयंसेवक धावून गेले आहेत. आमच्या भागात जेव्हा

---

◻ संघाच्या कवायतींवर बंदी घालण्याबाबतच्या या ठरावावर चर्चा होत असताना विरोधी पक्षांचे जेमतेम तीस-चाळीस सदस्य हजर होते. याउलट जनता पक्षाचे बहुसंख्य आमदार उपस्थित होते. मुख्यमंत्री शरद पवार व उत्तमराव पाटील, सदानंद वर्दे, हशू अडवानी, हसमुख उपाध्याय हे मंत्री चर्चेच्या वेळी मधून मधून उपस्थित होते.

◻ हा ठराव मांडणाऱ्यात यशवंतराव मोहित्यांबरोबरच आ. य. ए. पाटील, उदयसिंहराव गायकवाड, सुधाकर नाईक इ. ची नावे होती; पण एक मोहिते सोडून अन्य कोणीही ठरावावरील चर्चा ऐकण्यास हजर नव्हते.

---

जेव्हा दुष्काळ पडतो तेव्हा तेव्हा झुणका-भाकर केंद्र चालविण्यासाठी संघ-स्वयंसेवक पुढे येतात. आमचे राष्ट्र सेवा दल किंवा तुमची युवक कॉंग्रेस तेव्हा कुठे असते हो ?

'मोहितेसाहेब, संघाने चारित्र्यवान माणसे या देशाला पुरविली आहेत. १९ महिने येरवड्याच्या जेलमध्ये संघाच्या चड्ड्या मी जवळून पाहिल्या आहेत. संघाची चड्डी म्हणजे चारित्र्याची आणि त्यागाची चड्डी आहे ! संघाच्या चड्ड्यांवर कधीही मी अस्वच्छ डाग पाहिलेले नाहीत ! संघावर टीका करता; पण मोहितेसाहेब, मी विचारू इच्छितो, तुम्ही संजय गांधींची चड्डी बघितली आहे ? संजयच्या या युवक कॉंग्रेसचे कर्तृत्व काय आहे हो ? एकदा नुसते हे युवक बलसाडवरून रेल्वेने गेले तर रेल्वेच्या डब्यात निरोध सापडले, असले त्यांचे चारित्र्य !

'मोहितेसाहेब, संघटना बांधायला निष्ठा लागते, त्यागाची गरज असते. एक खुर्ची गेली तर आपल्या सात कॉंग्रेस होतात तिथे संघटना नीट बांधणे ते कसे जमावे ?'

आपल्या भाषणात जाता जाता गुलाबरावांनी संघस्वयंसेवकांनी केवळ राजनारायण त्यांच्या घरी उतरले म्हणून शांती नाइकांच्या मोटारीवर हल्ला केला, असा एक गौप्यस्फोट केला.

गुलाबरावांच्या या सडेतोड व परखड भाषणानंतर कॉंग्रेस (इंदिरा)चे आ. भेंडारकर यांचे भाषण झाले. संघ जातीयवाद पसरवीत असल्याचे सांगून त्यांनी कवायतींवर बंदी घालण्याचे समर्थन केले. त्यानंतर जनता पक्षाचे आ. सुभाष सवंगौड यांनी संघबंदीच्या विरोधात भाषण केले, कॉंग्रेस (इं)चे श्री. आनंदराव देवकते यांनी ठरावाला पाठिंबा देताना संघ ही एक विषवल्ली असून गावागावात जाऊन आम्ही संघाला ठेचून काढू, असे सांगितले. त्यानंतर बोलताना आ. कुमार सप्तर्षी म्हणाले की, 'संघ कितीही वाईट असला तरी बंदीचे समर्थन होऊ शकणार नाही. संघावर बंदी घालण्याचा मोहित्यांचा ठराव म्हणजे आणीबाणीला पाठिंबा देणाऱ्या त्या 'बंदी' आणि 'मुस्कटदाबी'च्या प्रवृत्तीचाच नवा अवतार आहे !'

त्यानंतर रिपब्लिकन पक्ष गवई गटाचे आ. बाजीराव कांबळे यांचे ठरावाला पाठिंबा देणारे भाषण झाले. डॉ. आंबेडकरांनी आम्हाला करुणा दिली आणि रा. स्व. संघात अतिरेकी शिस्त असल्याने करुणेचा अभाव असल्याचे त्यांनी सांगितले. 'संघाची जात्यंध प्रवृत्ती आपणास सर्वत्रच दिसून येते व या प्रवृत्तीतूनच संघ भटांची संस्कृती आणण्याचा प्रयत्न करीत आहे !' असेही श्री. कांबळे म्हणाले. संघ अशिक्षित व अडाण्यांना फसवीत असल्याचा आरोपही त्यांनी केला. त्यानंतर केलेल्या भाषणात मार्क्सवादी आमदार श्री. सत्येंद्र मोरे यांनी कोणत्याही जातीयवादी संघटनेस वाव देण्यास आपला विरोध आहे; परंतु संघटनेवर बंदी घालण्यात येऊ नये असे आपले मत असल्याचे सांगितले.

श्री. मोरे यांच्यानंतर आ. राम कापसे यांचे भाषण झाले. लोकशाही, सहजीवन, धर्मनिरपेक्षता इत्यादींवर संघाचा विश्वास आहे, हे आ. कापसे यांनी विविध उदाहरणे देऊन स्पष्ट केले. 'संघात काहीही गुप्त नसते, कोणालाही कोणतीही माहिती विचारता येते,' हे स्पष्ट करून ते म्हणाले, 'जेलमधले आमचेही काही अनुभव सांगण्यासारखे आहेत. जेलमधील काही नावाचे एक कार्यकर्ते रोज्याचा उपास करीत होते. त्यांना त्यांच्या सोयीच्या वेळेवर भोजन मिळावे हा आग्रह धरून त्यासाठी उपोषण करणारे रामभाऊ म्हाळगी होते ! मोहितेसाहेब, धर्मभेदाच्या गोष्टी तुम्ही करता; पण या जाति-धर्मभेदाच्या बळावर आपण किती दिवस राजकारण खेळणार आहात ? ते दिवस आता संपले. आता आर्थिक प्रश्न महत्त्वाचे आहेत.

'संघाला सहजीवन अभिप्रेत आहे. तसे ते हवे आहे म्हणूनच आज आम्ही इथे आहोत. सर्वांबरोबर सर्वांच्या, अगदी विरोधी पक्षाच्यासुद्धा, सत्कार्याने काम करावे, अशी आमची धारणा आहे.

'संघाची बाजू मांडण्यासाठी संसदेत लोकप्रतिनिधी हवेत या एकाच हेतूने संघ-विचारी मंडळींनी जनसंघाची स्थापना केली. अन्य सर्व पक्षांना तेव्हा संघाचे वावडे होते. तुम्ही दरवाजे बंद केले म्हणून संघाला नवा पक्ष काढावा लागला'. ब्रिटिशांना संघाने मदत केली हा आरोप खोटा आहे, हे स्पष्ट करण्यासाठी आ. कापसे यांनी नॅशनल अर्काइव्हजमधील दस्तऐवजांचे संदर्भ दिले.

संघ ही काळाची गरज आहे, असे सांगून आ. कापसे म्हणाले की, 'नुसत्या पैशाच्या बळावर संघटना उभी रहात नाही. माणसे मिळविण्याची, टिकविण्याची व घडविण्याची खरी आवश्यकता आहे. आज या देशात माणूस घडविणे हीच खरी समस्या असताना माणूस घडविण्याचा कारखाना म्हणून काम करणारा संघ देशविघातक कसा ठरतो ?'

निःशब्द शांतता असलेल्या सभागृहात अत्यंत मुद्देसूद व प्रभावी भाषण करताना आ. कापसे पुढे म्हणाले, 'संघाने काही चांगल्या परंपरा पाडल्या आहेत. संघाने निर्व्यसनी, सच्चरित्र, निःस्वार्थ माणसे उभी केली आहेत. संघाचा कार्यकर्ता हा कार्यक्षम असलाच पाहिजे, असा संघाचा अट्टाहास आहे. संघाची माणसे नुसती प्रामाणिकच नव्हेत तर कार्यकुशल आहेत. गुलाबराव पाटील यांनी संघाला मनुस्मृती मान्य असल्याचे सांगितले ! पण मनुस्मृतीत जे जे हीन टाकाऊ आहे त्याचा त्याग करण्यास संघ तयार आहे. शूद्रांना क्षुल्लक अपराधाबद्दल निर्दय शिक्षा देणारे मनुस्मृतीतील ते पान जाळायला मीही तयार आहे. जे चांगले ते जपावे, वाईट ते टाकावे अशीच संघाची भूमिका आहे.'

---

□ ठराव मांडतानाचे आपले भाषण संपविताना मोहिते म्हणाले, संघ कसा आहे हे सांगण्यासाठी एका महापुरुषाचे उद्गार पुरेसे आहेत. तो महापुरुष म्हणतो की, जनता पक्ष म्हणजे जनसंघ होय, जनसंघ म्हणजे रा. स्व. संघ व रा. स्व. संघ म्हणजे प्लेगचा उंदीर !

□ ठरावावरील चर्चेला उत्तर देताना केलेल्या भाषणात मोहिते म्हणाले की, संघ लोकशाहीवादी आहे, निधर्मी आहे हे राम कापशांनी पुस्तकांच्या आधारे दाखवून दिले आहे; पण सामान्य जनता आपल्या अनुभवांवरून मते बनवते तेव्हा देवरसांनी मुलाखतीत काय सांगितले यापेक्षा आम्ही अनुभवतो काय हे अधिक महत्त्वाचे आहे.

---

'संघविरोधकांनी संघ समजून घ्यावा,' असे आवाहन करून आ. कापसे यांनी आपले भाषण संपविले.

आ. राम कापसे यांच्यानंतर मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी शासनाची भूमिका मांडली. संघाच्या भूमिकेशी आपण सहमत नसलो तरी संघाबाबत आपण खुल्या मनाने चर्चा करण्यास तयार आहोत, असे ते म्हणाले. संघाच्या कवायतींवर बंदी घालण्याची मागणी अयोग्य असल्याचे सांगून त्यांनी तो एक राजकीय फॅसिझम ठरेल असे सांगितले. 'संघाला विरोध करायचा असेल तर तो लोकशाही पातळीवर व वैचारिक पद्धतीनेच केला पाहिजे!' असेही श्री. पवार म्हणाले.

या सुमारे पाच तासांच्या प्रदीर्घ चर्चेला प्रस्ताव मांडणारे आ. यशवंतराव मोहिते यांनी सुमारे अर्धा तास भाषण करून उत्तर दिले. मोहिते म्हणाले, 'मनाची कवाडे उघडी ठेवून मी ही चर्चा ऐकली आहे व राम कापसे यांनी मला दिलेले संघाचे साहित्य वाचून बदलली तर माझी मते मी निश्चित बदलीन. वस्तुतः बंदीवर माझा व्यवहारतः विश्वास नाही; परंतु सभागृहाची नाडी जाणून घ्यावी, मने समजून घ्यावीत व संघासारख्या विषयावर विचारमंथन घडवून आणावे याच हेतूने मी हा ठराव सभागृहासमोर मांडला.


साडेपाच तासांच्या या चर्चेचे वैशिष्टय म्हणजे एवढी प्रदीर्घ चर्चा होऊनही ती कंटाळवाणी झाली नाही. एक शे. का. प. सोडला तर बहुतेक सर्व पक्षांचे वक्ते या ठरावावर बोलले. ठरावाला खुद्द मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले व ते अपेक्षितच होते.

या ठरावाने वा चर्चेने काय साध्य झाले? मोहित्यांना खरेच विचारमंथन वगैरे हवे होते की नाही कोण जाणे; पण त्या निमित्ताने एक दिलखुलास, मनमोकळी चर्चा घडवून आणण्याचे पुण्य त्यांना मिळाले आहे. संघ विधानसभेत समजावून सांगता आला म्हणून जनसंघाला, संघावर प्रच्छन्न टीका करता आली म्हणून इंदिरावाद्यांना, संघबंदीला विरोध करताना व संघाचे कार्य गौरविताना मध्यम मार्ग निवडता आला म्हणून समाजवाद्यांना व संघाच्या काठीने काँग्रेस (आय) मधील एकाधिकारशाहीला (अवघड जागी) झोडपता आले म्हणून शरद पवारांना ह्या चर्चेचा वापर करता आला. अशा तऱ्हेने सर्वांनाच ही चर्चा सोयीची ठरली. □

---


## हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?
## राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?

या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी........



# नाझी भस्मासुराचा उदयास्त

लेखक : वि. ग. कानिटकर

आवृत्ती : तिसरी (सचित्र)

किंमत : रुपये पंचेचाळीस

राजहंस प्रकाशन, पुणे

संध्याकाळचे पुणे । दि. बा. मोकाशी

# आजच्या स्त्रियांचे पातिव्रत्य

'आजच्या काळांत पतिव्रताधर्म पाळणे शक्य आहे का?' स्त्रियांच्या परिसंवादासाठी कुणा पुरुषाने वरील विषय दिला. हा पुरुष कोण होता हे कळले नाही.

हा विषय पुरुषाने दिला हा गौप्यस्फोट परिसंवादाच्या अध्यक्षा महिलेनेच केला तो केल्यावर ज्या पुरुष श्रोत्यांच्या ओठांवर हसू उमटले त्यांपैकीच तो पुरुष असावा असा मला संशय आहे. आपण केवढा स्फोटक विषय दिलाय याची त्या बिचाऱ्याला तेव्हा कल्पनाही नसेल! जो विषय स्त्रियांना अडचणीत टाकील असे वाटले होते त्या विषयाने पुरुषांनाच अडचणीत टाकले. 'पतिव्रता' या शब्दाला पुरुष जेवढे बिचकतात तेवढ्या स्त्रिया बिचकत नाहीत हे लक्षात आले. विज्ञान परिषदेच्या श्रीमती मेहेंदळे यांनी तर 'पतिव्रता' शब्दाला नवा अर्थ दिला. त्या म्हणाल्या 'पतीने व्रत घेतले तर त्यात सहभागी होणारी ती पतिव्रता; पण हल्ली व्रत घेणारे पति आहेत का? आणि घेतले तर तो कुठले व्रत घेतो? एखादा पुरुष दारू प्यायला लागला तर बायकोने त्या व्रतात का सहभागी व्हावयाचे?'

दुसऱ्या वक्त्या श्रीमती साठेबाई म्हणाल्या, 'आम्ही बायकांनीच मूर्खासारखी घरांतली आणि बाहेरची सर्व कामे हाती घेतली.'

श्रीमती गुप्तेबाई म्हणाल्या, 'माझे आजोबा आजीशी फार वाईट वागत. आजी त्यांना अतिशय घाबरे. पुरुषांना किती घाबरावे, असे मला वाटे. म्हणूनच नवीन लग्न झाल्यावर हे उजवीकडे म्हणाले की मी डावीकडे वळत असे.'

परिसंवादातील ही केवळ झलक आहे. त्यावरून बायकांच्या मनात काय चालते हे पुरुषांच्या लक्षात येईल, की तीन तपे संसार होऊनही बायकांच्या मनाचे आकलन होत नाही. आपल्याला तीस वर्षे वाटत आलेले असते की बायको घरची-दारची कामे हौसेने करते, पोस्टात रेडिओचे लायसन्स भरण्यास तिला आनंद वाटतो. तिथे जेवढा जास्त क्यू तेवढा तिला जास्त आनंद मिळतो किंवा मंडईतून भाजी आणण्यात तिला हौस वाटते. तिथे जेवढी जास्त गर्दी तेवढी तिची हौस वाढते आणि बँकेत जाणं तर तिला फारच आवडतं. तो पैशाचा 'फील' तिला धुंद करतो. आपण मुलांना शिकविताना चिडतो. बायकोला ते छान जमतं. शिकविण्याची तिला मूळचीच आवड, ती आवड पुरी होते. तिला ऑफिस असलं तरी आदरातिथ्याचं फार असल्यानं पाहुण्यांचं कमी करीत नाही. ऑफिसमध्ये जाताना ती हळूच विचारते 'गोडीचं काय आणू?' तिचा तो उत्साह व हौस पाहून कौतुक वाटतं. आपण आरामखुर्चीत बसून डोळ्यानं तिचं कौतुक करतो. केवढा आनंद मिळतोय तिला! आणि आपण आनंद मिळवून देतो याचं धन्य वाटतं!

आणि तीस वर्षांनंतर कुणी तरी गृहिणी जेव्हा म्हणते आम्ही बायकांनीच मूर्खासारखी घरातली व बाहेरची कामे हाती घेतली, तेव्हा धक्का बसतो. फार दुःख होते. तुम्ही स्वतःशी म्हणता, केव्हा मी हिला कामे सांगितली? तुमच्यासारखे तिने चतुरस्र व्हावे एवढेच तुमच्या मनात होते; पण स्त्रीचा स्वभावधर्म तुम्ही पुरुषासारखा मानला हीच तुमची चूक झाली. स्त्रिया अशी चूक कधीही करणार नाहीत. त्या पँट घालतील, बॉब करतील, कुंकू लावणार नाहीत. पण वागायाची वेळ आली की त्या स्त्रियांसारख्या वागून तुम्हाला चकित करतील. आणि तीस वर्षे सुखाने चाललेला संसार वरच्यासारखे बोलून बेचव करतील. स्त्रिया स्त्रियांसारख्या वागणार व बोलणार हे ज्यानं जाणलं तो संसारात यशस्वी झाला असे समजावे! 'आजच्या काळात 'पतिव्रताधर्म पाळणे शक्य आहे का?' हा परिसंवाद तीन एप्रिल रोजी गायआळीतील, राहळकर राममंदिराच्या रामनवमी-उत्सवात ठेवला होता. राममंदिरात पतिव्रताधर्माबद्दल परिसंवाद व्हावा यात गम्मत होती. विशेषतः गमतीचा हा विषय ठेवून ज्या पुरुषाने आजच्या स्त्रीच्या पातिव्रत्याबद्दल संशय व्यक्त केला, तो रामाचा किंवा त्या वेळच्या कुणा अयोध्येकराचा वंशज असावा. या आरोपाला सीतेची त्या वेळची प्रतिक्रिया भूमीत गडप होण्याची होती; पण आजच्या सहा सीतांनी पुरुषांना पुरुष वर्गाचे स्थान दाखवून दिले.

◻

रहाळकर राममंदिरातील रामपंचायतनाची मूर्ति अतिशय सुंदर आहे. सुमारे दीडशे वर्षांपूर्वी गणेशरामबाबा रहाळकर रामदासी यांचे प्रथमदर्शनी तिने चित्त वेधले, तसे आजही ती आपले चित्त वेधून घेते. त्या काळी ही मूर्ति काकिर्डे सराफांकडे गहाण ठेवलेली होती. तिथेच ती गणेशरामबाबा रहाळकर रामदासी यांनी पाहिली व त्यांचे चित्त वेडावून गेले. त्यांनी ती विकत घेण्याचा यत्न केला; पण गहाणाएवढी किंमत देणं त्यांना शक्य नव्हतं ते खट्टू होऊन घरी आले. तिकडे रात्री काकिर्डे सराफांना ताप भरला आणि त्यातच मूर्तीने स्वप्नात येऊन आपणास गणेशरामबाबा रहाळकर रामदासी यांचेकडे पोहोचवण्यास सांगितले. तेव्हा मोठी मिरवणूक काढून वाजत-गाजत ती मूर्ति रहाळकर यांजकडे धाडली. ती रहाळकरांकडे पोहाचताच काकिर्डे सराफ यांचा ताप उतरला. रहाळकर यांनी लगोलग त्या मूर्तीवर मंदिर बांधले आणि तेव्हापासून तिथे रामनवमीचा उत्सव सुरू झाला.

◻

त्याच उत्सवात होणाऱ्या कार्यक्रमांत वरील परिसंवाद झाला. पुण्यातील मंदिरे आता पुन्हा सांस्कृतिक केंद्रे होऊ लागली आहेत. अशा उत्सवांतून भजन-प्रवचन याबरोबरच सामाजिक प्रश्नही चर्चिले जाऊ लागले आहेत. 'आजच्या काळात पतिव्रताधर्म पाळणे शक्य आहे का?' या विषयावरचा परिसंवादही पूर्वपक्ष-उत्तरपक्ष होऊन पद्धतशीर झाला. एकूण अध्यक्षांसह सहा वक्त्या बोलल्या. पहिल्या वक्तीने सांगितले

की, 'परपुरुषाचा स्पर्श, दृष्टी, सहवास आणि त्याच्याशी बोलणं या चार तऱ्हांनी स्त्रीचे पातिव्रत्य भंग पावते. आज या चारही गोष्टी स्त्रीला टाळता येत नाहीत म्हणजे स्त्रीचे पातिव्रत्य राहणे आज शक्य नाही.'

त्यानंतरच्या वक्त्या श्रीमती आपटेबाई यांनी सांगितले की, 'आपले संस्कार असे आहेत की, स्त्रीचे पातिव्रत्य कधीही जाणार नाही. आज गाड्यांच्या गर्दीत किंवा नोकरीच्या ठिकाणी परपुरुषांशी स्पर्श, बोलणे वगैरे झाले तरी त्यांनी स्त्रीच्या पातिव्रत्याचा भंग होत नाही.'

कामसूत्रकार वात्स्यायन, आपटेबाईंशी काहीसा सहमत आहे असे म्हणता येईल. कामाची व्याख्या वात्स्यायनाने 'पंचेंद्रियात्मक काम' अशी केली आहे. स्पर्श, बोलणं, रूप, रस व गंध वगैरेंनी काम उत्पन्न होत असल्यामुळे पतिखेरीज इतर कुणाशीही स्पर्शादि गोष्टी झाल्या तर पातिव्रत्याचा भंग झाला असे म्हणावे लागेल; पण ते खरे नाही. कारण 'कामपूर्तीच्या' हेतूने जवळ येणाऱ्या स्त्री-पुरुषांनाच कामाची ही व्याख्या लागू आहे. अशा कामोत्सुक स्त्री-पुरुषांची स्पर्शादि गोष्टींनी कामपूर्ति होत राहते; पण जिथे मनात कामेच्छाच नाही तिथे स्पर्शादि गोष्टींनी दोष उत्पन्न होत नाही. गाडीच्या गर्दीतील स्पर्श त्यातलाच. गर्दीत पुरुष खोड्या काढतात त्यात पुरुषाच्या मनात वासना असली तरी स्त्रीच्या मनात नसल्याने तिच्या पातिव्रत्याचा भंग झाला असे म्हणता येणार नाही. म्हणूनच एक वक्त्या म्हणाल्या तसं 'युद्धकाळी किंवा अन्य वेळी स्त्रीवर अत्याचार होतो त्यात स्त्रीचे पातिव्रत्य जात नाही. याच वक्त्या (गुप्तेबाई) शेवटी म्हणाल्या की, 'पातिव्रत्य राहणार, संसार राहणार, कुटुंबसंस्था राहणार.' पर्याय सापडेपर्यंत हे सर्व रहावे असे मलाही वाटते.

या पतिव्रताधर्म पाळण्याच्या प्रश्नाने, जशा एक दगडाने अनेक मधमाशा उठतात तसे अनेक प्रश्न चवताळून उठले. स्त्रिया करीत असलेल्या घरच्या व बाहेरच्या कामांची यादी निघाली–भाजी आणायची, गिरणीतून दळण आणावयाचं, मुलांना शाळेत पोहोचवायचं, त्यांचा अभ्यास घ्यावयाचा, दवाखान्यात जावयाचं, मोलकरीण नसली तर धुणं–पाणं करावयाचं, पाहुण्यांचं पहावयाचं आणि नोकरी करावयाची. स्त्रियांसाठी वसतिगृह चालवणाऱ्या एका वक्त्या बाईनं सांगितलं, 'एक बाई अपरात्री जागा मागायला आली. तिच्या नवऱ्यानं तिच्या पगारावर घर बांधलं आणि दुसरी बाई घरात आणून हिला हाकलून दिली.' पुरुषांना किती घाबरावयाचं असे म्हणणाऱ्या गुप्तेबाई म्हणाल्या, 'बायको स्वयंपाकाचं करून कामावर जाते. बायकोची कणव येऊन एखादा पुरुष जर तिला घरात मदत करू लागला तर त्याच्या आई-बहिणी म्हणतात, बायल्या झाला. यात बायलेपणा काय आहे? यात साधी माणुसकी आहे.'

शेवटी अध्यक्षा परांजपेबाई म्हणाल्या, 'हा पातिव्रत्य वगैरे प्रश्न मध्यमवर्गीय आहे. झोपडपट्टीत राहणारांचे काय? खरे म्हणजे आम्ही स्त्रियाच आमच्या शत्रू आहोत. नोकरीवर न जाणाऱ्या स्त्रिया पातिव्रत्यभंगाचा प्रश्न काढतात.'

□

या परिसंवादामुळे एक गोष्ट नक्की झाली की, स्त्रिया कितीही पुरुषी झाल्यासारख्या वाटल्या तरी त्या अजून स्त्रिया आहेत, पुढेही तशाच राहतील. आज मुली पँट घालोत, पुरुषांचे खेळ खेळोत, पुरुषांची कामे करोत, त्या शेवटी मुलीच राहणार. थोडक्यात स्वयंपाकाची कामे करणारे पुरुष जर स्त्रिया होत नाहीत तर ट्रॅक्टर चालवणारी स्त्री पुरुष का व्हावी? स्त्रियांवर पुरुषांचे जे आरोप आहेत त्याला वेगळी कारणे आहेत. मला वाटते, पुरुषांना स्त्रियांच्या कर्तृत्वाची भीती वाटू लागली आहे आणि जन्मभर राबवायला मिळणारे माणूस बंड करणार असेही भय मनात आहे. तसे नसेल आणि लग्नाला पन्नास वर्षे झाल्यावरही स्त्री ही पुरुषाहून निराळी आहे, हे पुरुषाला कळत नसेल तर पुरुष बुद्दू आहेत.

पण पुरुषांना ही गोष्ट लग्नानंतर पन्नास वर्षांनीसुद्धा कळत नाही हे दुःखद सत्य आहे. नवरा-बायको बाहेर गेली आहेत. वाटेत बायको नाकाला पदर धरून म्हणते — 'शी: काय घाण आहे!' ती हे एकदा म्हणते, दोनदा म्हणते, तीनदा म्हणते. शेवटी नवरा चिडून ओरडतो, 'सारखी घाण-घाण काय म्हणते आहेस? कुठे घाण आहे? मला येत नाही. मूर्ख!' नवऱ्याचा हा स्फोट पाहून बायको गप्प बसते; पण तिला घाण येत असते हे बरोबर आहे. कारण स्त्रीची पंचेंद्रिये ही पुरुषांपेक्षा नैसर्गिकरीत्याच जास्त तीक्ष्ण असतात. याचेच दुसरे उदाहरण– लक्ष्मीरोडवर नवरा-बायको पातळखरेदीला जातात. ती एका दुकानात चाळीस पातळे पहाते, त्याहून जास्त दुसऱ्या दुकानात पहाते. अशी सहा दुकाने होतात. तिला रंग पसंत पडत नाही. नवरा भयंकर कंटाळतो, चिडतो, दुकानाबाहेर पडलं की वाटेल ते बोलतो; पण त्याला हे कळत नाही की, स्त्रियांना रंगाचा सेन्स नैसर्गिकरीत्या पुरुषाहून जास्त असतो. त्यामुळे तो चिकित्सा करते.

स्त्रियांची ही निराळी धारणा इंग्लंडमधील एका बाईने ओळखली. तिच्या लक्षात आले की, स्त्रियांचा स्वभावधर्म जाणून काढलेले एकही मासिक इंग्लंडमध्ये नाही. सर्व मासिके पुरुषी दृष्टिकोनातून आहेत. समाजात पन्नास टक्के स्त्रिया आहेत. त्यांच्यासाठी मासिक काढलं तर ते त्यांना नक्की आवडेल. त्याप्रमाणे मासिक काढून आज स्त्रियांच्या मासिकांत दिसणारी सदरे तिने प्रथम सुरू केली. स्वयंपाकाचे पदार्थ, विणकामाचे नमुने, शिवणकाम, स्त्रियांचे आरोग्य, स्त्रियांचे राशिभविष्य, रोमँटिक, सुखान्त गोष्टी. लौकरच ते मासिक स्त्रियांत लोकप्रिय झाले व जगातील पहिल्या नंबरचा खप त्या मासिकाने गाठला. आपण स्त्रियांचे मासिक का सुरू केले हे आपल्या चरित्रात सांगताना तिने सांगितले आहे–

स्त्रियांसाठी मासिके, पाक्षिके, साप्ताहिके, स्त्रियांसाठी कादंबऱ्या, स्त्रियांसाठी त्यांना हव्या असलेल्या विषयांची पुस्तके भराभर बाहेर पडून खपू लागल्यावर पुरुषी वाङ्मयाच्या खपावर त्याचा परिणाम नक्कीच झाला. त्याचा अभ्यास कुणी तरी केला पाहिजे.

तेव्हा आता स्त्रियांचा काळ आहे, हे ओळखून कुणाही पुरुषाने स्त्रियांना अडविणारे विषय परिसंवादात देऊ नयेत, नाही तर तुम्हासच पातिव्रत्याने रहाण्याची वेळ येईल. स्त्रिया पुरुष होत चालल्या आहेत, हा मूर्ख समज करून घेऊ नका. तिने नाकाला पदर लावला तर 'कबूल! घाण येत असेल' असे म्हणा आणि ती पातळ निवडीत असताना शांत डोके ठेवून शांतपणे उभे राहण्यास शिका. स्त्रिया या स्त्रियाच राहणार आहेत. तेव्हा तुम्ही जर ठामपणे पुरुष राहिलात तर आज किंवा केव्हाही स्त्रियांना पातिव्रत्य धर्म पाळणे शक्य होईल आणि अशा परिसंवादाची वेळच येणार नाही. □

# युगांडा

## शिक्षणतज्ज्ञाकडे देशाची सूत्रे

वा. दा. रानडे

'आम्ही टांझानिकाचे लोक एक मेणबत्ती पेटवून किलिमांजारो पर्वताच्या शिखरावर ठेवीत आहोत. तिचा प्रकाश आमच्या सीमेपलीकडेही जाईल आणि हा प्रकाश जेथे निराशा असेल तेथे आशा देईल, विद्वेष असेल तेथे प्रेम देईल आणि अवहेलना होत असेल तेथे प्रतिष्ठा देईल.'

टांझानियाचे अध्यक्ष ज्यूलिअस न्येरेरे यांनी पंधरा वर्षापूर्वी काढलेले हे उद्‌गार आपल्या कृतीने खरे केले आहेत. शेजारच्या युगांडामधील इडी अमीनची सैतानी हुकूमशाही राजवट पाडण्यासाठी टांझानियातून परागंदा झालेल्या बंडखोरांना त्यांनी मदत केली आणि या मदतीने इडी आमीनचा पाडाव करून तेथे युसुफ लुले यांच्या नेतृत्वाखाली नवीन सरकार स्थापन केले.

किलिमांजारो पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या मोशी गावी युगांडातून परागदा झालेल्या किंवा हद्दपार केलल्या शंभर नेत्यांची बैठक भरली होती. अमीनचा पाडाव करण्यासाठी आम्हा युद्धाला मदत करायला तयार आहोत, पण तुम्ही एकत्र येऊन एक नेता निवडा, असे न्येरेरे यांनी त्यांना सांगितले होते. त्याप्रमाणे ही बैठक भरली होती आणि तीत एकमताने लुले यांची नेतपदी निवड झाली व तेच आता नव्या सरकारचे अध्यक्ष झाले आहेत.

लुले गांधीजींकडून प्रेरणा घेतलेले नेते आहेत. न्यरेरेंचे ते मित्रच आहेत. तीस वर्षांपूर्वी एडिंबरो विद्यापीठात ते दोघे सहाध्यायी होते आणि तेव्हापासून त्यांनी आपली मैत्री कायम टिकविली आहे. मोशी येथील बैठकीत सर्व गट एकत्र येऊन त्यांनी युगांडा राष्ट्रीय मुक्ती आघाडी स्थापन केली आणि अमीनविरोधी लढा शेवटपर्यंत नेटाने चालविण्याचा निर्धार केला आणि लुले यांच्या नेतृत्वाखाली तो लढा यशस्वी केला.

लुले हे राजकारणी नेते नव्हेत. शिक्षणक्षेत्र हेच त्यांचे खरे कार्यक्षेत्र. दक्षिण आफ्रि-केतल्या फोर्ट हेअर विद्यापीठातून पदवी-परीक्षा पास झाल्यावर काही काल त्यांनी शिक्षकाची नोकरी केली व नंतर एम्. ए. साठी एडिंबरो विद्यापीठात त्यांनी प्रवेश केला. एम्. ए. झाल्यानंतर ते युगांडास परतले आणि मॅकेरेरे कॉलेजात (याचेच पुढे मॅकेरेरे विद्यापीठ झाले.) पहिले आफ्रिकन प्राध्यापक म्हणून त्यांची नेमणूक झाली व त्याच कॉलेजचे ते पुढे प्राचार्य झाले. युगांडातील स्वातंत्र्यापूर्वीच्या सरकारमध्ये ते काही काल मंत्री होते. नंतर युगांडा पब्लिक सर्व्हिस कमिशनचे अध्यक्ष म्हणून त्यांची नेमणूक झाली व त्या जागी असलेले सर बर्नार्ड डिबन्सेन पूर्व आफ्रिका विद्यापीठाचे कुलगुरु झाले. 'स्वच्छ मनाचा, चांगली निर्णयशक्ती असलेला, व्यापक अनुभव असलेला आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाचा माणूस,' अशा शब्दात लुले यांचा गौरव सर बर्नार्ड यांनी केलेला आहे.

शिक्षण आणि प्रशासनाच्या क्षेत्रात एवढे मोठे कर्तृत्व असूनही युगांडाचे माजी अध्यक्ष डॉ. ओबोटेंशी त्यांचे पटले नाही. कारण प्रत्येक शिक्षणसंस्था आपल्या धोरणानुसारच चालली पाहिजे, असा ओबोटे यांचा आग्रह होता. लुले यांनी त्यास विरोध केला आणि आपल्या सहकाऱ्यांचा पाठिंबा मिळवून विद्यापीठाचे क्षेत्र राजकारणापासून दूर ठेवले. लुले स्वतंत्र विचाराचे होते व आहेत. पक्षीय राजकारणात स्वतःला गुंतवून घेणे त्यांना मान्य नव्हते. शिक्षणक्षेत्रातील त्यांच्या कामगिरीमुळे त्यांना आंतरराष्ट्रीय ख्याती मिळाली आणि मॅकेरेरे विद्यापीठाचाही लौकिक वाढला. डॉ. ओबोटे या विद्यापीठाचे कुलपति झाल्यावर त्यांनी लुले यांना कुलगुरुपदावरून दूर केले. शिक्षणक्षेत्रापासून राजकारण दूर ठेवले पाहिजे, असा आग्रह लुले यांनी धरला तेव्हापासूनच ओबोटे यांच्याशी त्यांचा संघर्ष सुरू झालेला होता.

मॅकेरेरे विद्यापीठातून बाहेर पडल्यानंतर लुले लंडनमधील राष्ट्रकुल सचिवालयात आणि तेथील शिक्षण, युवक व कायदा विभागाचे ते प्रमुख झाले. 'एक चारित्र्यसंपन्न, विचारशील आणि तात्कालिक राजकारणाच्या गाळात न फसता स्वतःला नेहमी वर ठेवणारी व्यक्ती,' अशा शब्दांत त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन त्यांच्या एका सहकाऱ्याने केले आहे. या त्यांच्या व्यक्तिमत्त्वामुळे सर्वांनाच त्यांच्याबद्दल आदर वाटतो.

राष्ट्रकुल सचिवालयात दोन वर्षे काम केल्यानंतर असोसिएशन ऑफ आफ्रिकन युनिव्हर्सिटीज (आफ्रिकन विद्यापीठ संघटना) या आक्रा येथील संस्थेचे सेक्रेटरी-जनरल म्हणून त्यांची १९७२ मध्ये नियुक्ती झाली व काही महिन्यांपूर्वीच त्या पदावरून ते निवृत्त झाले होते आणि लंडनमधील आपल्या घरी आपल्या कुटुंबाबरोबर शांतपणे जीवन जगावे असा त्यांचा विचार होता; पण देशाची हाक आणि सहकाऱ्यांचे दडपण त्यांना स्वस्थ बसू देईना. अमीनविरोधी युगांडा राष्ट्रीय मुक्ती आघाडीचे नेतृत्व त्यांनी पत्करले आणि आता वयाच्या ६८ व्या वर्षी देशाचे प्रमुख म्हणून त्यांनी सूत्रे हाती घेतली आहेत.

अमीनच्या हुकूमशाही राजवटीच्या सर्व खुणा पुसून टाकून आणि लोकशाही प्रस्थापित करून त्यांना देशाची पुनर्घटना करावयाची आहे. आपण दोन वर्षे अध्यक्षपदी राहू, तोपर्यंत निवडणुका घेऊन लोकप्रतिनिधींकडे सत्ता सोपवू, असे अध्यक्ष या नात्याने रेडिओवरून केलेल्या पहिल्याच भाषणात त्यांनी सांगितले. अमीन यांनी आपल्या आठ वर्षांच्या हुकुमशाही राजवटीत दोन लाख लोकांची कत्तल केल्याचा आरोप त्यांनी केला. अमीन राजवटीत ज्यांनी गुन्हे केले त्या सर्वांची न्यायालयापुढे चौकशी होऊन त्यांना कायद्याप्रमाणे शिक्षा होईल, असे त्यांनी जाहीर केले; पण त्याचबरोबर न्यायालयाबाहेर कोणालाही सूडाने वागविण्यात येणार नाही; कायद्याच्या राज्यावर आमचा विश्वास आहे, असे आपले धोरण त्यांनी स्पष्ट केले. देशावर आता पुन्हा दुसऱ्या हुकुमशहाला राज्य करू द्यावयाचे नाही, असा निर्धार लोकांनी केला पाहिजे असे आवाहन त्यांनी केले.

देशात कायद्याचे राज्य प्रस्थापित करणे, लोकांना त्यांची प्रतिष्ठा पुन्हा मिळवून देणे, पुनर्रचनेचा व पुनर्वसनाचा कार्यक्रम हाती घेणे आणि शेजारी देशांशी व जगाशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करणे, हे आपल्यापुढील तातडीचे कार्य असल्याचे त्यांनी सांगितले.

शिक्षणक्षेत्रातला माणूस देशाच्या नेतृत्वाची सूत्रे समर्थपणे व कार्यक्षमतेने हलवू शकेल काय ? श्री. लुले यांच्या कर्तृत्वाला हे मोठे आवाहन आहे; पण लोकांच्या पाठिंब्याचे बळावर आपण ते यशस्वीपणे पार पाडू, असा त्यांना विश्वास वाटतो. त्यांच्या नेतृत्वाखाली युगांडाच्या इतिहासाचे एक नवे पान सुरू होत आहे. □

# गॉर्की कॉलनी

: लेखक :
ए. एस्. मकरेन्को

: अनुवाद :
मीनाक्षी कोल्हटकर

पूर्वसूत्र : १९२३ च्या हिवाळयात अनेक घडामोडींमुळे सामुदायिकांच्या दृष्टीने नवीन संघटना करण्यासाठी अनेक सुधारणा केल्या गेल्या. त्यात मुख्यत्वेकरून सैनिकी पद्धतीवर छोटया छोटया तुकडया व त्यांचे अधिकारी यांची नेमणूक ही होय.

वसंतऋतूच्या सुरुवातीपासूनच निरनिराळया लहान लहान तुकडयांची उभारणी आणि कामाचं खातेनिहाय वाटपही करण्यात आलं. या संमिश्र तुकडया अस्तित्वात येण्याचं मुख्य कारण म्हणजे शेतीचा वाढता भार हे होतं.

पण ट्रेपकेवाडीतले रहिवासी बिघडायला लागले होते. रोडिमचिकला तर हाकलूनच द्यावं लागलं. नव्या कॉलनीत सारख्या मारामाऱ्या होऊ लागल्या. सामानाच्या चोऱ्यांचं प्रमाणही वाढायला लागलं. खरोखरच सामुदायिकात काही तरी फार मोठा बिघाड झाल्याचं स्पष्ट दिसत होतं.

काम करण्यासाठी खरीखुरी प्रामाणिक माणसं कुठून मिळवायची, हा प्रश्न आन्तोनना सतत भेडसवायला लागला.

## प्रकरण सत्ताविसावे

## कोम्सोमोलची नाट्यपूर्ण सुरुवात

१९२३ मध्ये गॉर्कीवाल्यांचे नियमित विभाग एका पक्क्या स्वरूपात एकाएकी कोम्सोमोलमध्ये सामील झाले.

गॉर्की कॉलनी ही काही वेगळी अशी संस्था नव्हती. १९२१ पासून आमचे आमच्या आजुबाजूच्या जनतेशी निरनिराळया प्रकारचे संबंध होते. आमचे जवळचे शेजारी सामाजिक दृष्टीने व ऐतिहासिक दृष्टीने तसे आमचे शत्रूच होते. आम्ही शक्यतो वेळोवेळी त्यांचा मुकाबला करायचा प्रयत्न केला होता; परंतु आमच्या छोटया छोटया कारखान्यांमुळे त्यांना आमच्याशी आर्थिक संबंध ठेवावे लागले होते. आम्ही स्टारात्झेवोएसारख्या लांबवरच्या खेडयापर्यंतही दुरुस्तीचे काम करून देत असल्यामुळे आमचे आर्थिक संबंध आमच्याशी वैर धरणाऱ्या लोकांच्याहीपेक्षा लांबपर्यंत जाऊन पोचले होते. १९२३ च्या सुमाराला गोंचारोव्का, म्हयुरोगोव्का, झामीरालोव्का वगैरे आम्हाला जवळ असलेल्या खेडयांतून आमचे चांगले संबंध—नुसतेच आर्थिक संबंध नव्हेत तर सामाजिकसुद्धा—प्रस्थापित झाले होते. आमच्या कॉलनीतले हीरो, आजुबाजूला पसरलेले नैसर्गिक सौंदर्य त्या परिसरातले स्त्री-सौंदर्य पहाण्याच्या निमित्ताने आणि कधी कधी स्वतःची नवीन प्रकारची केशरचना, कपडयांचे प्रकार दाखविण्याच्या निमित्ताने जात असल्याने आमच्या कॉलनीच्या मुलांचे त्या लोकांशी बरेच संबंध आले होते. याच कारणाने आमच्या मुलांचा प्रथम कोम्सोमोल या संस्थेशी परिचय झाला.

या खेडेगावातून कोम्सोमोलची संघटना संख्येने आणि गुणात्मकदृष्टयाही तेवढीशी भक्कम नव्हती. तिथली मुले मुख्यत्वेकरून मुलींच्या मागे फिरणे व पिणे एवढाच कार्यक्रम करीत असत. अशा तऱ्हेचा आमच्या मुलांवर प्रभाव पडणे योग्य नव्हते. कोम्सोमोलच्या दुसऱ्या किनाऱ्यावर लेनिन शेतकी संस्था आमच्या नव्या कॉलनीसमोर स्थापन झाली आणि नकळतच त्यांचे आमच्या गावाचे सोविएत व मध्यम शेतकऱ्यांचा समुदाय यांच्याशी बिनसले. त्याच वेळी तिथल्या स्थानिक कोम्सोमोल सभासदांच्यातलढाऊ वृत्ती असल्याचे आमच्या नजरेला आले आणि त्यांनी त्या आर्टेलच्या तरुण सभासदांबरोबर दोस्ती करण्यास सुरुवात केली.

आमच्या मुलांना या शेतकी संस्थेच्या लोकांना त्यांच्या संस्थेची संघटना करायला किती त्रास पडला याची चांगली कल्पना होती. या संस्थेने प्रथम सधन शेतकऱ्यांना धक्का दिला. त्यामुळे त्या शेतकऱ्यांकडून त्यांना बराच विरोध झाला; परंतु ते त्याने डगमगले नाहीत.

या सधन शेतकऱ्यांचा तसा मोठा प्रभाव होता व शहरातही त्यांचे

पाठीराखे होते. त्यांचा मुख्यत्वे हा स्वभाव शहरातल्या अधिकारी-वर्गाला माहीत नव्हता. झगडे जास्त करून शहरातल्या कचेऱ्यांत झडत व लेखणीद्वारे त्यांचा मुकाबला होई. त्यामुळे आमच्या कॉलनीतल्या मुलांना त्यामध्ये फारसा भाग घेता येत नव्हता. जमिनीची मोजणी झाल्यानंतर व त्याचे योग्य ते वाटप झाल्यानंतर आमच्या मुलांना आणि शेतकी संस्थेच्या मुलांना खरेखुरे काम मिळाले. या योगाने त्यांचे व आमचे संबंध जास्त जवळचे झाले.

कोम्सोमोलच्या मुलांना शेतकी संस्थेमध्ये फारसा वाव नव्हता. कारण ती एकंदर शिक्षणात आमच्या मोठ्या मुलांच्या मानाने मागे पडत. आमच्या शाळेच्या शिक्षणामुळे आमच्या मुलांना फार फायदा झाला व त्यांची राजकीय जागरूकता वाढली. आमच्या कॉलनीची मुले अभिमानाने स्वत:ला खरीखुरी कष्टकरी समजत. त्यांना खेड्यातली इतर मुले व ते यांच्यातला फरक चांगला समजत असे. शेतावर सतत आणि कठोर परिश्रम केल्यामुळे आयुष्यात आपल्याला दुसऱ्या अनेक गोष्टी साध्य करायच्या आहेत याची त्यांना जाणीव होती.

मोठी मुले आपण पुढे काय करणार किंवा काय केले पाहिजे याबद्दल स्पष्टपणाने बोलत आणि ही त्यांची कल्पना दृढ करण्यामध्ये शहरातल्या तरुण मुलांचा जास्त प्रभाव पडला.

आमच्या जवळच्या रेल्वे स्टेशनच्या बाजूला इंजिन वर्कशॉप होते आणि तिथे खूपशी माणसे, चित्रविचित्र गोष्टी आमच्या मुलांच्या दृष्टीने होत्या. या इंजिन वर्कशॉपला क्रांतिकारी महत्त्व होते. या इंजिन वर्कशॉपचा मोठा उज्ज्वल क्रांतिकारी भूतकाळ होता आणि तिथे चांगली पक्षसंघटना होती. आमची मुले हे वर्कशॉप म्हणजे जणू काही पऱ्यांचा राजवाडाच समजत. या राजवाड्यात अनेक चांगल्या चांगल्या गोष्टी होत्या: मोठमोठे विभाग, प्रचंड यात्र्या, वाफेच्या जोरावर चालणारे हातोडे, प्रचंड गुंतागुंतीची यंत्रे वगैरे गोष्टी त्यांना अर्थपूर्ण वाटत. या राजवाड्यातली माणसे तिथले कारागीर व राजपुत्र-तेलकट, चकचकीत कपडे घालून व लोखंड आणि घाम यांचा संमिश्र वास सोडीत इकडून तिकडे फिरत असत. त्या राजवाड्यातील उत्तम वस्तूंना व संपत्तीला हात लावायचा फक्त त्यांनाच अधिकार होता. खाऊन-पिऊन गुबगुबीत झालेले व चांगले चांगले कपडे घातलेले मध्यम शेतकऱ्यांसारखे चेहरे दिसत नव्हते. याउलट खिळे, यंत्र, त्यांचा उपयोग, त्यांचा आपआपसात एकसूत्रीपणा या गोष्टींच्याबद्दल पुरेपूर ज्ञान असलेली, आपल्या कामात वाकबगार, तरतरीत व उत्साही अशी माणसे इथे दिसत असत. या कामगारांमध्ये खूपसे कोम्सोमोल होते आणि यांनीच आमच्या मुलांना आकर्षित करून घेतले होते. या ठिकाणी खरा उत्साह नांदत होता व कामगार वर्गाचे कवित्वही तिथे होते.

हे इंजिन वर्कशॉप म्हणजेच १९२२ साली आमच्या मुलांच्या महत्त्वाकांक्षेचे प्रतीक होते. खार्कोव आणि लेनिनग्राड इथली मोठमोठी इंजिन वर्कशॉप्स् म्हणजे मानवी बुद्धी व कर्तृत्व यांची कमालच म्हटली पाहिजे. ही आमच्या मुलांना जणू परिकथेतल्याप्रमाणे वाटत असत. आमच्या छोट्याशा कॉलनीच्या मुलांची बौद्धिक पातळी एवढी उंचावेल असे त्यांना स्वप्नातही वाटत नसे; पण हळूहळू आम्ही त्या इंजिनशॉपमधल्या कामगारांशी दोस्ती केली. त्यांना आम्ही जवळून पाहू लागलो आणि त्यांच्या कर्तृत्वाचा आम्हाला प्रत्यय येऊ लागला.

त्यांचे कोम्सोमोल प्रथम आमच्याकडे यायला लागले. एक दिवस कारावानोव माझ्या ऑफिसात घाईघाईने आला व उत्साहाने मला सांगू लागला, 'आपण केवढे भाग्यवान ! इंजिन वर्कशॉपचा कोम्सोमोल आपल्याकडे आला आहे !'

ते सात कोम्सोमोल आमच्याकडे ओळख करून घेण्यासाठी आले होते. त्यांनी आमच्या कॉलनीबद्दल बरेच ऐकले होते. सगळी मुले त्यांच्याभोवती आदराने आणि प्रेमानं अगदी खेटून उभी होती. सबंध दिवसभर त्यांनी त्यांच्या संगतीत राहून व त्यांच्याबरोबर फिरून नवी कॉलनी, घोडे, आमची निरनिराळी आयुधे, शेरेसाहेब, आमचे उष्ण घर वगैरे गोष्टी त्यांना दाखविल्या; पण त्यांच्या इंजिनशॉपच्या तुलनेने आमचे काम म्हणजे काहीच नव्हते. हे कोम्सोमोल कुठल्याही प्रकारे आपला मोठेपणा न दाखविता उलट आमची कॉलनी पाहून व आमचे काम पाहून प्रभावित झालेले दिसले, या गोष्टीचा आमच्या मुलांना फार अभिमान वाटे.

परत जाण्यापूर्वी ते कोम्सोमोल माझ्याकडे भेटावयास आले होते. आमच्या कॉलनीत कोम्सोमोल-चळवळ का नाही, असे ते विचारीत. मी त्यांना थोडक्यात आमच्या कोम्सोमोलची झालेली परवड सांगितली: आम्ही १९२२ सालापासून खरे तर कोम्सोमोल केंद्र सुरू करायचा प्रयत्न करीत होतो; परंतु तिथल्या स्थानिक कोम्सोमोलनी आम्हाला सतत विरोध केला होता. आमची कॉलनी म्हणजे उन्मार्गी मुलांना ठेवायची जागा; तेव्हा अशी उन्मार्गी मुले कोम्सोमोलमध्ये कशी येऊ शकतात, असा सवाल प्रत्येकजण आम्हाला करीत असे. आम्ही अनेकदा विनंत्या केल्या, चर्चा केल्या, शिष्टमंडळे पाठविली; पण आम्हाला सदा एकच उत्तर मिळाले ते असे, 'आमची मुलं उन्मार्गी आहेत. त्यांना कोम्सोमोलमध्ये यायचंच असेल तर ती संपूर्ण सुधारली आहेत असं शिफारसपत्र आम्हाला मिळालं पाहिजे, तरच आम्ही त्यांना कोम्सोमोलमध्ये घेण्याचा विचार करू !'

इंजिन वर्कशॉपच्या कामगारांनी आम्हाला खूप सहानुभूती दाखविली आणि आम्हाला कोम्सोमोल केंद्रात सामावून घेण्याची खटपट करण्याचे वचन दिले. दुसऱ्या रविवारी त्यांच्यातला एक कामगार मुद्दाम आम्हाला भेटण्यासाठी आला; परंतु त्याने आणलेली बातमी निराशाजनक होती. शहर कमिटीचे लोक त्याला विचारीत,

'उन्मार्गी मुलांच्या कॉलनीत कोम्सोमोल कसं होईल ? कारण ते सर्व गुन्हेगार आहेत व उन्मार्गीपण आहेत !'

मी त्यांना समजावून सांगितले, 'तसे गुन्हेगार आमच्यामध्ये फारच थोडे आहेत आणि सुधारणा या शब्दाचा अर्थ तरी काय हे तुम्हाला माहीत आहे का ? केवळ सुधारणे हे कुणालाही पुरेसं नसतं, तर त्याला पुन्हा शिकविणं—नव्या रचनेत तो बरोबर सामावून जाईल अशा तऱ्हेचं शिक्षण देणं खरं अगत्याचं आहे. जर तुम्ही त्याचा भूतकाळ पुन:पुन्हा उकरून काढून, त्याला नाउमेद करून, कोम्सोमोल केंद्रात त्याला प्रवेश दिला नाही तर त्या शिक्षणाला काही अर्थ नाही !'

इजिनशॉपमधले कामगार माझ्याशी काही बाबतीत सहमत व असहमत राहिले. यातून सुवर्णमध्य काढणे त्यांना त्यांच्या आवाक्या-

बाहेर वाटले. आमच्या मुलांना कोम्सोमोलमध्ये प्रवेश मिळण्याचा प्रश्न तसाच अनिर्णित राहिला. हा प्रश्न कोण सोडविणार ? कोण, केव्हा आणि कसा ? अर्थात आमच्या कॉलनीचे कोम्सोमोलच तयार करून हा प्रश्न आम्ही सोडव शकणार होतो.

इंजिनशॉपमधले कोम्सोमोल आम्हाला वरचेवर येऊन भेटत; परंतु त्यांची आस्था फारशी बळकट नव्हती. मला असे आढळून आले की, त्यांच्या येण्यात शुद्ध हेतू नव्हता. प्रथम ते आमच्या मुलांना गुन्हेगार म्हणूनच ओळखत होते व त्यांच्या गुन्हेगारीच्या जुन्या कथा समजून घेण्यासाठी उत्सुकता दाखवीत असत. आमच्या मुलांनी केलेली कामे ते मान्य करीत; परंतु त्यांचे मन आमच्या मुलांबद्दल अजूनही साशंक असावे असे वाटे. तरीही मी व्यक्तिशः एकेका कोम्सोमोलला माझे म्हणणे पटवून देण्याचा आटोकाट प्रयत्न करीत राहिलो.

कॉलनी सुरू झाल्याच्या पहिल्या दिवसापासून आमची या प्रश्नावर अशी एक ठाम भूमिका होती. माझे स्वतःचे एक तत्त्व होते. उन्मार्गी मुलांना खरे शिक्षण द्यायचे असेल तर त्यांचा भूतकाळ—विशेषतः त्यांनी केलेले गुन्हे हे लक्षात घेऊ नयेत. हे जरी खरे असले तरी हे तत्त्व अंगीकारताना मला स्वतःलाच स्वतःशी खूप झगडावे लागले. कित्येकदा मला मुलांच्याबरोबर आलेल्या त्यांच्या अहवालामध्ये या मुलाने काय केले असावे हे जाणून घेण्याची जबरदस्त इच्छा होई. 'आजार बरा करण्यासाठी मूळ रोग जाणून घेणे अगत्याचे असते,' ही वैद्यकशास्त्राबद्दलची प्रचलित म्हण शिक्षणशास्त्रज्ञ नेहमी बोलून दाखवीत असत. माझे सहाध्यायी व शिक्षणखाते माझ्यापुढे अशा तऱ्हेचे तर्कशास्त्र नेहमी ठेवीत. कधी कधी मलाही ते मानण्याची जबरदस्त इच्छा होई.

उन्मार्गी किंवा गुन्हेगार मुलांचे चौकशीमंडळ प्रत्येक मुलाची एक संपूर्ण हकीगत आमच्याकडे पाठवीत. त्यामध्ये त्या मुलाने केलेला गुन्हा आणि त्याच्या घेतलेल्या जबान्या, पुरावे वगैरेसारखे भारूड लिहून पाठवीत आणि पुढचा शिक्षणक्रम ठरविण्याच्या दृष्टीने ते आवश्यकच असे समजले जाई.

मी माझ्या सहाध्यायांना या गोष्टी अनावश्यक असल्याचे पटवून दिले होते आणि १९२२ मध्येच मी चौकशीमंडळाला हे अहवाल न पाठविण्याविषयी कळवले होते. आम्ही खरोखर मनापासून मुलांच्या या हकीगती संपूर्णपणे विसरण्याचा प्रयत्न करीत होतो आणि ती मुलेही कालांतराने त्यांचा भूतकाळ खरोखर विसरून गेली होती. गुन्हेगारीत घालविलेल्या जुन्या आयुष्याबद्दल आस्था न दाखविण्यात मी मुलांना तयार केले होते आणि त्याचा मला खरोखरच फार आनंद वाटत असे. ह्याबाबतीत आम्ही आमचे ध्येय खरोखरच गाठले होते. नवीन भरती झालेली मुलेसुद्धा आपल्या जुन्या आयुष्याबद्दल बोलायला व सांगायला लाजत असत

असे सर्व काही असताना कोम्सोमोलचे केंद्र कॉलनीत काढायच्या प्रश्नावर मात्र आमच्या मुलांना पुन्हा त्यांच्या जुन्या आयुष्याकडे बोट दाखवून हिणविण्यात येत होते, 'तुम्ही उन्मार्गी आहात. तुमचा भूतकाळ असा आहे आणि तुम्हाला सुधारलं पाहिजे !' वगैरे गोष्टी बजावण्यात येत होत्या.

कोम्सोमोल केंद्र आमच्या कॉलनीत सुरू करण्याची कल्पना आमच्या मुलांच्या मनात दृढ झाली आणि या प्रश्नावर जरूर चळवळ करायची असा त्यांनी निश्चय केला. आमच्यातल्या तारानेट्स वगैरे मुलांनी तडजोड करायचे सूचित केले. 'कोम्सोमोलमध्ये ज्यांना जायचे असेल ते सुधारले असे शिफारसपत्र द्यावे व त्यांनी कॉलनी सोडून जावे !' अर्थातच या सूचनेला पाठिंबा मिळाला नाही. झादारोव चिडून म्हणाला,

'हे आम्हाला बिलकूल मान्य नाही ! कुणालाही आम्हाला फसवायचं नाही ! आम्ही कोम्सोमोल कॉलनीत सुरू करण्यासाठी शिकस्त करणार आणि मध्यवर्ती कोम्सोमोलच, आम्ही लायक आहोत की नालायक आहोत ते ठरवू दे !'

आमची मुले पुष्कळदा शहरातल्या कोम्सोमोल केंद्रात जात–येत; परंतु त्यांना अजून यश मिळाले नव्हते.

१९२३ च्या हिवाळ्यात आमची आणखी एका कोम्सोमोल केंद्राशी ओळख अगदी अचानकपणे घडून आली.

एके दिवशी संध्याकाळी मी व ब्राटचिन्को कॉलनीकडे परत येत होतो. आमची मेरी घोडी आमच्या गाडीला जोडलेली होती. आम्ही टेकडी उतरत असताना एक अगदी अनपेक्षित गोष्ट म्हणजे एक उंट आमच्या नजरेस पडला. उंटाच्या येणाऱ्या स्वाभाविक घृणेमुळे मेरी एकाएकी उधळली. ब्राटचिन्को तिला आवरू शकला नाही. आमच्या गाडीचे जू बनविण्यात काही तरी दोष होता. ब्राटचिन्कोने आम्हाला तो अनेकदा दाखविला असूनही आम्ही तो नीट करण्याकडे फारसे लक्ष पुरविले नव्हते. पुढील संकटाची आम्हाला साधारण कल्पना आली आणि याच घटनेमुळे आम्ही वर नमूद केलेल्या कोम्सोमोल केंद्रात येऊन पडलो. मेरी भरधाव धावत सुटली व तिच्या मागच्या पायाला जोखडामुळे थोडी जखम झाली. जखम झाल्यामुळे ती अधिकच चिडून काय प्रसंग आणील याची आम्ही कल्पनाच करू शकत नव्हतो. मी व ब्राटचिन्कोने लगाम खेचण्याचा प्रयत्न केला; पण मेरी आणिकच वेड्यापिशासारखी धावत सुटली ! आमचा शेवट जवळ आला असे आम्हाला वाटू लागले. रस्त्याच्या पुढील वळणावर काही लोकांचा जमाव उभा असलेला दिसला. त्यांचे घोडे पाणपोईवर पाणी पीत होते व सोडलेल्या गाड्या एका बाजूला दिसत होत्या. रस्ता बंद असल्यामुळे आपोआपच आमची गाडी अडेल अशी आमची कल्पना होती; परंतु मेरी त्या सगळ्यांच्या मधून धावत पुढे गेली. काही तरी मोडल्याचा आवाज आम्ही ऐकला; परंतु आम्ही खूपच दूर गेलो होतो. उतार संपून आम्ही सपाट रस्त्याला लागलो. ब्राटचिन्कोने मागे वळून पाहिले व तो म्हणाला, 'आपण लवकरच पळ काढला पाहिजे. कारण मेरीने त्या गाड्यांची काही तरी मोडतोड केलेली दिसते !'

ब्राटचिन्को चाबूक चालवायला लागला व मेरी पुन्हा जोरात धावू लागली. मी ब्राटचिन्कोचा हात खेचून त्याला बजावले, 'आपण पळावयाचं नाही, मागून कोणी तरी येतंय !'

एक माणूस आपल्या गाडीत बसून धीमेपणाने व जिद्दीने आमचा पाठलाग करीत असलेला दिसला. त्याच्या डोक्याच्या मागून नारिंगी रंगाचे एक शिरस्त्राण घातलेले डोके आमचा फसलेला पळून जाण्याचा विक्रम पहात होते. आम्ही एकदम थांबलो. तो माणूस गाडीवानाचे खांदे धरून त्याच्या गाडीमध्ये उभा असलेला आम्हाला

दिसला. कारण त्याला बसायला जागा नव्हती. त्याच्या गाडीचा मागचा भाग मोडून, लोंबत, फरपटत रस्त्यावरून येत होता.

'आमच्या मागून या!' असा आम्हाला त्यांनी हुकूम केला.

ब्राटचिन्को मनातून आनंदला. कारण त्याने असे काही होईल अशी अपेक्षा केली नव्हती. दहा मिनिटांच्या आतच आम्ही जी. पी. यू. च्या कचेरीसमोर येऊन थडकलो आणि ब्राटचिन्कोचा चेहरा एकदम उजळला. तो म्हणाला,

'आपण जी. पी. यू. च्या कचेरीत येऊन पडलो!' आमच्या भोवती लाल टोप्या घातलेल्या लोकांचा गराडा पडला व एकजण आमच्याकडे बघून ओरडला,

'या एवढ्याशा मुलाला गाडी चालवायला सांगितल्यावर हे असंच होणार!' व माझ्याकडे वळून म्हणाला, 'तुम्हाला याचा जाब द्यावा लागेल!'

ब्राटचिन्को कमालीचा घाबरला व डोळ्यांत पाणी आणून एकीकडे बोट दाखवून म्हणाला, 'मी लहान आहे म्हणून हे असं झालं नाही, तर तुम्ही उंटासारखे प्राणी रस्त्यावर सोडता, मग आमची घोडी उधळली तर त्यात काय नवल?'

'कसले प्राणी म्हणालास?' पहिल्या माणसाने विचारलं.

'तो उंट!' ब्राटचिन्को म्हणाला.

ते लाल टोपीवाले मोठ्याने हसले व त्यांनी आम्हाला विचारले, 'तुम्ही कोठून आलात?'

मी त्यांना शांतपणे सांगितले, 'आम्ही गॉर्की कॉलनीतून आलो आहोत!'

'अच्छा, तुम्ही गॉर्की कॉलनीतले काय? आणि आपण कोण, डायरेक्टर का? अरे पहा, आपल्याला एक नवीन गोष्ट कळली!' सारेजण आमच्याभोवती जमा झाले व आमच्याकडे जणू काही आम्ही त्यांचे पाहुणेच आहोत अशा कुतूहलाने पाहू लागले.

आता त्यांनी आपल्याच गाडीवाल्याला दम दिला आणि सर्वांनी ब्राटचिन्कोवर कॉलनीसंबंधी प्रश्नांचा भडिमार केला.

'आम्ही तुमच्या कॉलनीत येण्याचा विचार करीतच होतो. तुम्ही सारीजणं धडपडणारी आहात असं आम्ही ऐकलंय. आम्ही रविवारी तुमच्याकडे भेटायला येऊ!'

इतक्यात आतून पुरवठा खात्याचा अधिकारी बाहेर आला व रागारागाने मोडतोडीबद्दलचा आमचा अहवाल तयार करू लागला.

'गप्प बसा हो! काय लिहून घेता? तुम्ही उगाच दादागिरी करू नका!' सर्वजण त्याच्यावर ओरडले.

तो परत म्हणाला, 'काय लिहून घेता म्हणजे काय? यांनी आपली गाडी मोडली आहे, हे पाहिलंत का तुम्ही? त्यांनीच ती दुरुस्त करून द्यावी असा मी त्यांना लेखी हुकूम देतो!'

'ते दुरुस्त करून देतील. त्याची तुम्हाला बिलकूल काळजी नको! खरं की नाही?' नंतर आमच्याकडे वळून ते म्हणाले,

'तुमच्या कॉलनीबद्दल आम्ही खूपखूप ऐकलं आहे. तुमच्याकडे बंदिस्त जागा नाही हे खरं का?'

'बंदिस्त जागा म्हणजे काय? तुमच्याकडे आहे का?' ब्राटचिन्कोनं विचारले.

पुन्हा एकदा ते सारे खळखळून हसले.

'आम्ही नक्कीच येत्या रविवारी तुमच्याकडे येऊ आणि ही गाडी येताना दुरुस्तीसाठी घेऊन येऊ!'

'तोपर्यंत मी माझं काम थांबवून ठेवू?' तो पुरवठा खात्याचा अधिकारी खेकसला.

मी त्याला शांतपणाने सांगितले, 'आमच्याकडे दुसरी गाडी आहे ती मी तुम्हाला तात्पुरती देतो. आमच्याबरोबर कुणाला तरी पाठवा!'

अशा तऱ्हेने आम्हाला नवीन मित्र मिळाले. रविवारी हे चेका कोम्सोमोल ठरल्याप्रमाणे आमच्या कॉलनीत आले. पुन्हा एकदा तो अप्रिय प्रश्न-कोम्सोमोल केंद्राचा-चर्चेला निघाला; परंतु या चेका-मंडळींनी एकमताने आमची बाजू घेतली.

ते म्हणाले, 'गुन्हेगार म्हणजे काय? याचा अर्थ काय? असं म्हणायला त्या म्हणणाऱ्यांना लाज वाटली पाहिजे आणि हे सारे लोक स्वतःला मोठे सज्जन समजतात. हे लोक इथं जर तुमची दाद घेत नसतील तर आम्ही खारकोवमध्ये हा प्रश्न उपस्थित करू!'

आमची कॉलनी त्या वेळी एक नमुनेदार सुधारक-संस्था म्हणून ओळखली जाई व ती युक्रेनियन राज्याच्या शिक्षण खात्याच्या अधिकाराखाली होती व त्याच खात्याचे निरीक्षक आमची संस्था तपासायला येत. हे लोक प्रांतीयवादी नसून समाजशिक्षणाची खरी जाणीव असणारे होते. ही खारकोवची मंडळी समाजशिक्षण म्हणजे तरुणांना व्यक्तिस्वातंत्र्य दिले पाहिजे अशा काव्यमय कल्पना बाळगणारी नव्हती. याउलट त्यांना नवीन प्रकारची दृष्टी व नवा आकृतिबंध हवा होता. ते स्वतःला कोणी तरी विशेष समजत नसत. ते फौस्टप्रमाणे क्षणभंगुर सुखाच्या मागे धावणारे नव्हते, तर आमच्याशीही मित्रत्वाच्या व बरोबरीच्या नात्याने वागत व आम्ही काही नवीन केले असल्यास त्याबद्दल मनापासून संतोष दर्शवीत व कौतुक करीत.

खारकोवच्या मंडळींना आमच्या कॉलनीत कोम्सोमोल केंद्राबद्दल झालेल्या घडामोडींचा फार खेद वाटला—

'तुमच्या कॉलनीत कोम्सोमोल केंद्र नाही व ते तुम्हाला सुरूही करता यणार नाही! तुम्हाला ते कोणी सांगितलंय?'

संध्याकाळी ते सर्वजण आमच्या मुलांच्या घोळक्यामधून इकडेतिकडे फिरले व आस्थेवाईकपणे चर्चा केली.

या आमच्या मित्रांना व शिक्षण खात्याला आम्ही धन्यवाद देतो. युक्रेनियन कोम्सोमोलच्या मध्यवर्ती कमिटीत आमचा प्रश्न धसाला लागला आणि १९२३ च्या उन्हाळ्यापर्यंत तीव्हान नेस्टोरोविच कोवल या गृहस्थांची राजकीय तंत्रशिक्षक म्हणून आमच्या कॉलनीत नेमणूक झाली!

तीव्हान नेस्टोरोविच हे शेतकरी वर्गातून आलेले होते. त्यांच्या २४ वर्षांच्या आयुष्यात खूपसे मनोरंजक अनुभव— खेड्यातल्या चळवळींचे, राजकीय घडामोडींचे— आलेले होते. ते गृहस्थ फार बुद्धिमान व अत्यंत सुस्वभावी होते. प्रथमपासूनच त्यांनी आमच्या मुलांबरोबर बरोबरीच्या नात्याने बोलायला व वागायला सुरुवात केली आणि आपण खळ्यात व मळ्यात सारखेच वाकबगार आहोत हे त्यांनी दाखवून दिले.

अखेर आम्ही जिंकली व आमच्या कॉलनीत नऊजणांचे कोम्सोमोल केंद्र सुरू झाले. ◻

## प्रकरण अठ्ठाविसावे

# समारंभपूर्वक आगेकूच

देर्युचेन्को एकाएकी रशियन भाषेत बोलू लागला. त्याच्या घरामध्ये काही घडामोडी झाल्यामुळे हा चमत्कार एकाएकी घडून आला. देर्युचेन्कोची बायको—हिला युक्रेनियन भाषा व रीतिरिवाज यावद्दल फारसे प्रेम नव्हते—तिचा प्रसूतिकाळ जवळ आला होता. देर्युचेन्कोला आपल्या कोसॅक वंशाचा अभिमान होता आणि म्हणून त्याने आपली भाषा सोडली नव्हती. आपल्या शुद्ध युक्रेनियन भाषेमध्ये दाईला आणण्यासाठी ब्राटचिन्कोकडे घोडागाडीची त्याने मागणी केली. ब्राटचिन्कोच्या दृष्टीने प्रसूतीच्या वेळी दाईला आणण्याची जरुरी नव्हती. असले काम करायचे कॉलनीच्या वेळापत्रकात त्याच्या दृष्टीने बसत नव्हते. तरीही त्याने देर्युचेन्कोला घोडागाडी दिली; परंतु दुसऱ्या दिवशी असे आढळून आले की, देर्युचेन्कोच्या बायकोला शहरातच न्यायला पाहिजे. हे ऐकल्यावर ब्राटचिन्को चिडला आणि त्याने घोडागाडी द्यायचे साफ नाकारले.

मी, शेरे व कॉलनीतल्या इतर लोकांनी ब्राटचिन्कोच्या वर्तनाबद्दल त्याची खूप कानउघाडणी केली. शेवटी तो घोडागाडी द्यायला तयार झाला. इतका वेळ हा सर्व वादविवाद देर्युचेन्को शांतपणे ऐकत होता. त्याने ब्राटचिन्कोची समजूत काढायला सुरुवात केली—

'हे काम अत्यंत महत्त्वाचं आहे. एका तासाचा उशीर लावणंही फार धोक्याचं आहे!'

ब्राटचिन्कोने पण मनाशी हिशोब करून तितक्याच गंभीरपणाने देर्युचेन्कोला उलट प्रश्न विचारला, 'दाई आणायला घोडागाडी दिली होती की नाही? दिली होती. दाईला शहरात परत पोचवायला घोडागाडी दिली होती की नाही? दिली होती. आता पुन्हा घोडागाडी मागताय. कोणी तरी प्रसूत होणार आहे म्हणून त्या घोड्याने तरी का पर्वा करावी?'

'पण कॉम्रेड......'

'पण, परंतु राहू दे! समजा, उद्या प्रत्येकानेच जर असं करायला—प्रसूत व्हायला—सुरुवात केली तर काय होईल?'

शेवटी ब्राटचिन्कोने घोडागाडी जोडली; परंतु त्याला अगदी मंदगतीने चालणारे घोडे जोडले व सारोखाला गाडी चालवायला सांगितले. अर्थात त्यामुळे त्या बाईंना रस्त्यात फारसे धक्के बसले नाहीत. त्यानंतर देर्युचेन्कोची बायको, त्यांचे नवजात बालक यांना परत कॉलनीत आणण्यासाठी त्याने ब्राटचिन्कोकडे घोडागाडीची मागणी केली व ती त्याने मान्य केली.

देर्युचेन्को हा काही यशस्वी बाप ठरला नाही. त्याने आपल्या मुलाचे नाव तारास असे ठेवले होते. त्या तारासने हॉस्पिटलच्या आवारातच या जगाचा निरोप घेतला आणि देर्युचेन्कोच्या वंशाची वृद्धी तात्पुरती तरी थांबली. त्याचा चेहरा दुःखाने भरून गेला होता व त्याचा आवाजही दाटून आला होता. यापलीकडे काही त्याच्या दुःखाचे प्रदर्शन फारसे झाले नाही. उलट तो युक्रेनियन भाषेत ब्राटचिन्कोने त्याच्याशी केलेल्या वर्तनाबद्दल चिडून चिडून बडबडू लागला,

'उगाचंच घोड्यांना पाठविलं—पुष्कळ गाड्या होत्या—कुणालाच गडबड नव्हती—आणखीन थोडा वेळ थांबू शकलो असतो—लोकांना मुलं ही होणारच—ह्यांना त्याचं काहीच नाही!'

देर्युचेन्कोने आपल्या दुर्दैवी बायकोला आपल्या घरकुलात परत आणली व ब्राटचिन्कोचा त्रास काही दिवसांपुरता तरी थांबला. ब्राटचिन्को या सगळ्यातून वगळला गेला व देर्युचेन्कोची दुर्दैवी कहाणी तिथेच संपली. देर्युचेन्कोचा हा मुलगा जन्माला येण्यापूर्वी एक अगदी मामुली गोष्ट घडली. ती तशी मामुली नव्हती व तीच त्याच्या एकंदर दुःखाला कारणीभूत झाली.

सर्व शिक्षकवर्ग व इतर कार्यकर्ते मुलांच्याबरोबरच व त्याच प्रकारचे जेवण घेत असत; परंतु ज्यांची कुटुंबे होती त्यांना काही वेगळ्या गोष्टींची जरुरी भासत असे. शिवाय सामाईक स्वयंपाकघराचे कामही थोडे हलके व्हावे या हेतूने मी कालिनासाहेबांना, शिक्षकवर्गाला व बाकी कार्यकर्त्यांना कोरडा शिधा द्यावा अशी सूचना दिली होती. देर्युचेन्कोपण त्यापैकीच एक होता. एकदा मी शहरात गेलो असताना मला अगदी लहान प्रमाणावर एक लोण्याचा पुडा मिळाला. तो इतका लहान होता की, सर्वांना तो फारच थोडे दिवस पुरला असता. कोरडा शिधा देताना यात लोण्याचाही थोडासा भाग द्यावा असे आमच्या कुणाच्याही ध्यानात आले नाही; परंतु देर्युचेन्कोला जेव्हा समजले तेव्हा रोजच्या शिध्याबरोबर लोणी आपल्याला मिळाले नाही या गोष्टीची त्याला फार खंत वाटली. त्यांनी तावडतोब कोरडा शिधा नाकारून सामूहिक स्वयंपाकघरात आपली जेवणासाठी बदली करून घेतली. योगायोग असा की, त्याच सुमारास कालिनासाहेबांजवळ असलेला लोण्याचा साठा संपला व देर्युचेन्को चिडून माझ्याकडे तक्रार घेऊन आला.

'लोकांना फसवायचं तुम्हाला काहीही कारण नाही. लोणी कुठं आहे ते सांगा!' त्याने मला फर्मावले.

'कसलं लोणी? जे काय होतं ते केव्हाच संपलं!'

देर्युचेन्कोने ताबडतोब सामूहिक स्वयंपाकघरातून आपली बदली करून घेतली व पुन्हा एकदा कोरडा शिधा घ्यायला सुरुवात केली. दोनच दिवसांनी कालिनासाहेबांनी थोड्याशाच प्रमाणात लोण्याचा पुडा आणला; परंतु या वेळी देर्युचेन्कोने बदलाबदली केली नाही. काही तरी आमच्या पब्लिक एज्युकेशन खात्यात अचानक घडले आणि आम्हाला मिळणाऱ्या अन्न-धान्याच्या सोबतीला कधी कधी लोणी द्यावे अशी शिफारस झाली. कालिनासाहेब जेव्हा जेव्हा आमचा भत्ता आणायला शहरात जात त्या वेळी एक छोटासा टोप भरून लोणी घेऊन येत. तदनंतर कालिनासाहेब बाजाराला जाताना रिकामा टोप घेऊन जायला विसरत नसत. बरेच वेळा हा टोप तसाच रिकामा परत येई. अशा वेळी ते बडबडत, 'मूर्ख आहेत लेकाचे! माणसानं काही तरी समाधानानं बघावं अशी एकही चीज काही देणार नाहीत. वस्तू खाण्यासाठी असतात की वास घेण्यासाठी असतात हेही या मूर्खांना समजत नाही!'

देर्युचेन्कोला हे अगदी असह्य झाले आणि त्याने परत एकदा सामूहिक स्वयंपाकघरात नाव नोंदवले. हा मनुष्य म्हणजे दैनंदिन आयुष्यात बदल खपवून न घेणारा होता. देयुचेन्कोला सारासार विचार जरा कमीच होता व त्यामुळे लोण्यासारख्या वस्तू हळहळ जास्त प्रमाणात मिळतील याची त्याला जाणीव झाली नाही. आमच्या कॉलनीत मिळणारा लोण्याचा कोटा खूपच मोठ्या प्रमाणात वाढवून मिळाला व कोरडा शिधा घेणाऱ्या सर्व लोकांना पुष्कळ प्रमाणात लोण्याचा भागही मिळू लागला. बायका, मुले, आज्या वगैरे सर्व शिक्षकवर्गाची मंडळी लोण्याचे मोठमोठे गोळे आमच्या कोठारातून घेऊन जाताना दिसत. आतापर्यन्त त्यांनी सोसलेल्या दुष्काळाला एकदम पायबंद बसला; परंतु देर्युचेन्कोला या सगळ्या संधीचा फायदा मिळाला नाही. कारण तो सामूहिक स्वयंपाकघरात आपले जेवण घेत होता. या जबरदस्त धक्क्यामुळे देर्युचेन्को बेचैन झाला. त्याने पुन्हा एकदा कोरडा शिधा देण्याची मागणी केली. त्याचे दुःख खरोखरीच मोठे होते आणि सबंध कॉलनीच्या लोकांनी त्याला सहानुभूती दाखविली. एखाद्या खंद्या कोसॅकप्रमाणे हे दुःख त्याने पचवले; पण आपली युक्रेनियन मातृभाषा सोडली नाही!

हा लोण्याचा प्रश्न आणि त्याचा वंशवाढीचा प्रश्न हे दोन्ही प्रश्न एकामागोमाग घडून आले.

बिचारा देर्युचेन्को आणि त्याची बायको तारासच्या मृत्यूचे दुःख कसेबसे गिळीत होती. त्याच वेळेला त्यांच्या सुदैवाने कॉलनीच्या कर्मचाऱ्यांना पहिल्या पंधरवड्याचा कोरडा शिधा देण्याचा हुकूम काढला गेला आणि मुख्य म्हणजे या वेळेला लोण्याचा कोटाही त्या शिध्याबरोबर वाटण्यात आला. देर्युचेन्को अत्यंत आनंदित होऊन आपली पिशवी घेऊन कालिनासाहेबांकडे गेले. सूर्य अगदी तळपत होता. सर्व प्राणिमात्र आनंदात होते; पण हा आनंद थोडा वेळ टिकला. देर्युचेन्को पाय आपटीत माझ्याकडे आले. त्यांत कमालीचे दुःख झाले होते. ते त्यांच्या सहनशक्तीच्या अगदी बाहेर गेले होते. एखादी गाडी रुळावरून घसरून स्लीपर्सवर चालायला लागली असता जसा कडकडा आवाज येईल, जणू तशाच तऱ्हेने त्यांनी अस्खलित रशियन भाषेत मला जाब विचारला,

'माझ्या मुलासाठी मला लोणी का दिलं नाही?'

'कोण मुलगा?' मी आश्चर्याने विचारले.

'कोण मुलगा? माझा तारास, डायरेक्टरसाहेब, कुटुंबाच्या प्रत्येक माणसासाठी शिधा दिला पाहिजे आणि म्हणून तो माझ्या मुलालाही मिळाला पाहिजे!'

'पण तुमचा तारास आता आहे कोठे?'

'त्याच्याशी तुम्हाला कर्तव्य नाही. माझा मुलगा २ जून रोजी जन्माला आला व १० जून रोजी तो मेला असं शिफारसपत्र मी सादर केलं आहे. म्हणून त्या आठ दिवसांचा शिधा मला मिळालाच पाहिजे!'

कालिनासाहेब काय भानगड आहे ते बघण्यास आले होते. त्यांनी देर्युचेन्कोला दंड धरून विचारले,

'अहो महाशय, एकदम लहान अर्भकाला लोणी कधीपासून भरवायला लागलात? असले पदार्थ त्या छोट्या बालकाला कधी पचतील का याचा जरा विचार कर!'

मी आश्चर्यचकित होऊन आळीपाळीने दोघांकडेही बघत होतो.

मी म्हणालो, 'कालिनासाहेब, तुम्हा दोघांना झालंय काय? अहो, ते मूल तर तीन आठवड्यांपूर्वीच वारलं!'

'अच्छा! म्हणजे ते मूल केव्हाच मेलं. मग आता ते लोणी तुम्हाला कशासाठी पाहिजे? आता तुम्हाला लोण्याची जरुरी नाही! उलट तुम्हाला धुपाची खरीखुरी गरज आहे. त्या प्रेताजवळ लावायला धूपच योग्य असतो!'

देर्युचेन्को वेड्यापिशासारखा खोलीभर पाय आपटीत फिरत होता. तो रागारागाने म्हणाला,

'माझा मुलगा ८ दिवस जिवंत होता. तेव्हा मला त्याचा ८ दिवसांचा शिधा मिळालाच पाहिजे!'

'मिळालाच पाहिजे? तात्त्विकदृष्ट्या तुला मुलगा असला तरी व्यावहारिकदृष्ट्या तो कधीच नव्हता! त्याच्या असण्यानसण्यामुळं तुझ्या कुटुंबात काहीही फरक झालेला नाही!'

देर्युचेन्कोचे डोके खरोखरच फिरले होते आणि त्याच्या संपूर्ण हालचालींना काही धरबंदच राहिला नव्हता. त्याला स्वतःच्या अवताराची, कपड्याची काहीही शुद्ध नव्हती. तो तसाच जिल्ह्याच्या सार्वजनिक शिक्षणखात्याच्या कचेरीत अधिकाऱ्यासमोर जाऊन उभा राहिला. या खात्याच्या अधिकाऱ्यांनी मला बोलावणे पाठवले.

ते म्हणाले, 'तुमच्या संस्थेमधला एक गृहस्थ माझ्याकडे काही तरी तक्रार घेऊन आला होता. तो काही तरी तारास—लोणी—शिधा असं असंबद्ध बोलत होता. असल्या लोकांना तुम्ही कशाला तुमच्या संस्थेत ठेवून घेता? त्यांना ताबडतोब काढून टाका!'

मी त्यांना म्हटले, 'अहो, तुम्हीच त्याला नेमून आमच्याकडे पाठविलंत!'

'अशक्य! काहीही असलं तरी तुम्ही त्याला ताबडतोब काढून टाका!'

असा चांगल्या रीतीने याचा शेवट झाला. तारास व लोणी या गोष्टींमुळे हे सारे झाले. देर्युचेन्को आणि त्याची बायको पण रोडिमचिक गेलेल्या वाटेनेच परत गेले! मी व आमच्या कॉलनीतले सारेजण आनंदित झालो. या युक्रेनियन माणसांनी थोडा वेळ आमच्या कॉलनीत धुमाकूळ घातला होता; परंतु माझा आनंद निर्भेळ नव्हता. पुन्हा मला तोच प्रश्न—काम करायला माणसे कोठून आणायची—भेडसावू लागला. नव्या कॉलनीत एकही शिक्षक नव्हता; परंतु एकंदर गॉर्की कॉलनीचे नशीब थोरच म्हणायला पाहिजे. एक दिवस अचानक हवा तसा माणूस सापडला. मला तो खरोखरच रस्त्यात भेटला. तो सार्वजनिक शिक्षणखात्याच्या कचेरीसमोर उगाचच रस्ता न्याहाळीत बसला होता. मी व ब्राटचिन्को धान्याची पोती काढीत होतो. एवढ्यात ब्राटचिन्कोचा पाय कुठे तरी अडकला आणि तो खाली पडला. इतक्यात खरीखुरी माणुसकी असलेला तो माणूस आमच्या मदतीला धावून आला. त्याने व मी मिळून धान्याची पोती आमच्या गाडीवर चढविली. मी त्याचे आभार मानले. मी त्याला निरखून पाहिले. तो चांगला चुणचुणीत व वयाने तरुण असावा. त्याने स्मितहास्य करून आभार स्वीकार केला. त्याच्या डोक्यावर कोसॅक पद्धतीची पांढरी टोपी होती आणि चेहऱ्यावर सैनिकी रुबाब होता.

मी त्याला विचारले, 'तुम्ही सैन्यात असावेत असं मला वाटतं!'

'बरोबर आहे!' असे त्याने मला हसतहसत उत्तर दिले.

'घोडदळात ना?' मी पुन्हा त्याला विचारले.

त्याने 'होय' असे म्हटले.

'सार्वजनिक शिक्षणखात्याच्या कचेरीत तुम्ही कशासाठी आला होता?' मी विचारले.

'मला इथल्या प्रमुख अधिकाऱ्यांनी भेटायला बोलावलं होतं.' त्याने उत्तर दिले, 'मी त्याची वाट पहात होतो.'

'तुम्ही नोकरीच्या शोधात आहात का?'

'होय. मला व्यायामशिक्षकाची नोकरी देण्याचं त्यांनी कबूल केलं होतं.'

'मग थांबा, आधी तुम्ही माझ्याशीच बोला!'

'ठीक आहे.'

आम्ही दोघांनी चर्चा केली. तो आमच्या गाडीवर चढून बसला. आम्ही कॉलनीत परत आलो. मी त्याला सबंध कॉलनी फिरून दाखविली. त्याच रात्री त्याची नेमणूकही केली.

प्योतर इवानोविच याने कॉलनीत एक वेगळ्याच प्रकारची देणगी आणली. आम्हाला ज्या गोष्टींची अत्यंत जरुरी होती त्या म्हणजे – तारुण्य, उत्साह, ताकद, सोशिकपणा, धीमेपणा–या साऱ्या गोष्टी त्याने बरोबर आणल्या होत्या. त्याच्याजवळ शिक्षणशास्त्राबद्दल अढी नव्हती, तसेच स्वतःचा बडेजावही दाखवायची इच्छा नव्हती. स्वार्थीपणाही नव्हता. तो मुलांशी खेळीमेळीने वागे. त्याला दुसऱ्याही काही गोष्टींची आवड होती–पियानोवादन, सैनिकी शिस्त वगैरे. त्याच्या अंगात थोडेसे काव्यगुणही होते. त्याच्या देखरेखीखाली नव्या कॉलनीत वेगळाच रंग भरू लागला. कधी थट्टेने, कधी हुकूम करून, कधी रागावून प्योतर मुलांचे सामुदायिक बनवायला लागला. त्याची माझ्या शिक्षणतंत्रावर श्रद्धा होती. त्याने शेवटपर्यंत त्याबद्दल कधीही शंका व्यक्त केली नाही.

आमच्या दोन्हीही कॉलनीच्या कामाची घडी अशा तऱ्हेने बसू लागली. मला माझ्या सहकाऱ्यांमध्ये एकोपा व विश्वास वाटू लागला. हा एक नवाच अनुभव होता. तिखान नेस्टोरोविच, शेरे व प्योतर इवानोविच हे आमचे अनुभवी पुढारी बनले. त्यांनी चांगले काम करायचा जणू मक्ताच घेतला होता!

आता कॉलनीत एकूण ८० मुले होती. १९२०–२१ साली प्रथम आलेल्या मुलांनी एक भक्कम गट बनविला होता. त्यांनी जणू काही कॉलनीचे पुढारीपण स्वीकारले होते. नवीन आलेल्या कोणत्याही मुलांच्या विरोधामुळे न फुटणारी अशी एक भक्कम पोलादी एकजूट आपोआप तयार झाली. अर्थात तसा विरोध करण्याचा कोणी प्रयत्न केलेला माझ्या तरी पाहण्यात आला नाही. नवीन येणाऱ्यांवर कॉलनीचे वातावरण एकदम छाप पाडीत असे. कॉलनीची एकंदर जडणघडण, दैनंदिन आयुष्याचा साधेपणा, तिथल्या निरनिराळ्या चालीरीती अशा तऱ्हेने बनल्या होत्या की, त्या केव्हा व कुठे सुरू झाल्या ते मुलांनाही सांगणे कठीण झाले असते. प्रत्येकाची कामे काटेकोरपणाने आखून दिलेली होती. त्यासंबंधीचे नियम कॉलनीच्या घटनेत नमूद केलेले होते. त्यामुळे एखाद्याला त्यामध्ये बदल करणे किंवा ते टाळणे अथवा दुसऱ्यावर दादागिरी करणे अगदीच अशक्य होते. त्याच वेळी कॉलनीतल्या मुलांसमोर एक मोठे काम सतत उभे होते–नव्या कॉलनीची दुरुस्ती! आमच्या निरनिराळ्या वर्कशॉपचा विस्तार वगैरे वगैरे... या गोष्टी अगदी आवश्यकच होत्या आणि त्या पुऱ्या होणे हे प्रथम कर्तव्य आहे याबद्दल कोणाच्याही मनात संदेह नव्हता. या सर्व गोष्टींमुळे आम्ही गुपचूप रीतीने करावे लागणारे स्वार्थत्याग सोशीत होतो. चांगले कपडे, उत्तम खाद्यपदार्थ वगैरे गोष्टींवर जास्त खर्च न करता आम्ही शक्यतो काटकसर करून तो पैसा, बी–बियाणे, नवीन औते किंवा डुकरांचे खुराडे वगैरे बांधण्यासाठी खर्च करीत होतो. या आमच्या स्वार्थत्यागाकडे पहाण्याची आमची दृष्टी सोशिक असून आमचा त्यावर पूर्ण विश्वास होता. एकदा कॉलनीच्या सर्वसाधारण सभेमध्ये एका छोट्या मुलाने नव्या पाटलोणीची मागणी केली असता मी अभावितपणे, गंमतीने त्याला म्हणालो,

'हे बघ, आपण नव्या कॉलनीची दुरुस्ती पुरी करू. मग आपण श्रीमंत होऊ, मग आपण सर्वांनाच नवे कपडे करू! मुलांना मखमलीचे बनियन, त्यावर सुंदर चांदीचा पट्टा व मुलींना रेशमी झगे, कातडी बूट, प्रत्येक तुकडीला स्वतःची एकेक मोटरगाडी व प्रत्येक मुलाला आपण सायकल घेऊन टाकू! तसंच आपण सबंध कॉलनीभर गुलाबाची झाडं लावू! समजलं ना माझं म्हणणं? सध्या आपल्याजवळ असलेल्या या ३०० रुबलची एक चांगल्यापैकी गाय विकत घेऊ!'

मुले अगदी मनापासून हसली आणि त्यानंतर मुलांच्या ठिगळे लावलेल्या विजारी व तलकट डाग पडलेले त्यांचे अंगरखे आम्हाला वाईट दिसेनासे झाले.

हे सारे असे असले तरी आमच्या सामुदायिकावर व त्याच्या नेतृत्वावर सतत टीका करणारेही लोक होतेच. कारण आम्ही चाकोरीतून जाण्याची इच्छा धुडकावली होती. जगात कोणावर अशा तऱ्हेची टीका होत नाही? या अवघड कामामध्ये आमचे नेतृत्व फार व्यवस्थित आणि पद्धतशीरपणे चालेले होते. लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे त्यांच्या कामाची रीतच अशी होती की, त्यामुळे त्यांचे वेगळेपण बाकीच्या सामुदायिकात अगदी एकजीव झाले होते.

हे 'नेतृत्व' मुख्यत्वेकरून खालील व्यक्तींच्याकडे होते–काराबानोव, झादारोव, वशनेव, ब्राटचिन्को, वोल्कोव, वेट्कोव्स्की, तारानेट, बुरुन, मड, असादची, तात्या नोचेन्व्हनया व अलीकडे काही नवीन आलेली मंडळी–आप्रिस्को, जॉर्जव्हस्को, झार्काबोल्कोव, आल्योष्कावोल्कोव, स्टुपिवसीन आणि ऋडल्टी वगैरे मुलेही सामील झाली होती.

आप्रिस्कोने आन्तोन व ब्राटचिन्कोच्या स्वभावातील बऱ्याचशा सवयी आत्मसात केल्या होत्या. घोड्याबद्दल त्याचे प्रेम, उत्साह व कामाचा उरक चांगला होता. स्वतः होऊन कोणतेही काम करायची त्याला फारशी बुद्धी नव्हती; परंतु दिलेले काम मनापासून करणे हे त्याला माहीत होते.

गिओर्गेस्कीचे कॉलनीच्या मुलांच्या दृष्टीने दोन प्रकारचे व्यक्तिमत्त्व होते. त्याच्या एकदर चेहऱ्यावरून त्याला जिप्सी म्हणायला हरकत नव्हती त्याचा भुरकट चेहरा, काळेभोर डोळे, निरर्थक

विनोद व एकंदर मालकी हक्कांबद्दल मर्यादित खोडकरपणा यामुळेही तो जिप्सीसारखाच वाटे. खरे पहाता, तो चांगल्या सुशिक्षित घराण्यातला वाचन- मनन केलेला, शहरी चाली-रीती ठाऊक असलेला आणि स्पष्ट, शुद्ध भाषा वापरणारा असा होता. मुलांनी तर गिओर्गेस्की हा पूर्वीच्या इर्कूट्स्कच्या गव्हर्नरचा मुलगा होता अशी बातमी आणली होती; परंतु असल्या लाजिरवाण्या कुळात आपला जन्म झालेला नाही, असे तो आग्रहाने सांगे किंवा त्याच्याबरोबर आलेल्या पत्रकातही त्याबद्दल या विधानाला दुजोरा मिळाला नव्हता. असे असले तरी मी अशा काही बाबतीत मुलांच्यावर विश्वास ठेवीत असे. त्याला नव्या कॉलनीत एका तुकडीचा प्रमुख म्हणून पाठविला असताना त्याने खरोखरच उत्तम काम केले. त्याच्या सबंध सहाव्या तुकडीत या प्रमुखानेच चिक्कार काम केले. तो आपल्या तुकडीच्या मुलांना मोठ्याने पुस्तके वाचून दाखवीत असे. कपडे कसे घालावे, स्वतःच्या शरीराची स्वच्छता कशी ठेवावी वगैरे गोष्टी तो आपल्या तुकडीतल्या मुलांना नेहमी समजावून देत असे. लहान मुलांची काळजी घेणे व त्यांच्यावर प्रेम करणे हे आपले कर्तव्य आहे, हे तो प्रमुख मंडळात प्रतिपादन करीत असे. त्याच्या तुकडीत अगदी घाणेरडी व शेंबडी-लेंबडी मुले दिली होती; परंतु एका आठवड्यातच त्याने त्यांच्यात विलक्षण बदल घडवून आणला व त्यांना कॉलनीच्या इतर मुलांप्रमाणे कामाची आवड शिकवून दिली.

कॉलनीमध्ये झोर्काविल्कोव आणि आल्योष्कावोल्कोव असे दोघे भाऊ होते; परंतु त्या दोघांच्यात काडीभरही साम्य नव्हते. झोर्का-वोल्कोव हा सुरुवातीपासूनच कमालीचा आळशी, भांडखोर व चिरचिऱ्या स्वभावाचा मुलगा होता. तो कधीही हसत नसे व कुणाशी बोलत नसे. त्यामुळे तो कॉलनीत मिसळून न जाता पळून जाईल असे मला नेहमी वाटे; परंतु त्याच्यातला बदल शिक्षणतंत्राचा अगदी काहीही अवलंब न करता घडून आला; परंतु आमच्या प्रमुख मंडळात झोर्का व गलावेन्को या दोघांना बर्फ साफ करायला एकत्र ठेवण्यात आले. सर्वजण या जोडीला हसले.

या दोन कामचुकारांना एकत्र कामाला ठेवायची कल्पना कुणालाही फारशी पसंत नव्हती.

कोणी तरी गंमतीने या दोघांची संमिश्र तुकडी बर्फ साफ करण्यासाठी बनवावी असे ठरवले आणि ते कसे काम करतात ते बघावे. थोड्याशा चर्चेनंतर झोर्काव्होल्कोव्हला त्या तुकडीचा प्रमुख केला. गॅलॅटेन्को मात्र अजूनही तसाच होता. झोर्काला प्रमुख मंडळापुढे बोलावण्यात आले.

मी त्याला सांगितले, 'हे बघ झोर्का, आम्ही तुला संमिश्र तुकडीचा प्रमुख केला आहे आणि गॅलॅटेन्कोला तुझ्या मदतीला दिला आहे. तुला त्याला सांभाळून घेणे जमेल की नाही याची आम्हाला जरा शंका वाटते.' जरासा विचार करून झोर्का म्हणाला, 'मी त्याला सांभाळून घ्यायचा प्रयत्न करीन!'

दुसऱ्या दिवशी एक मॉनिटर धापा टाकीत माझ्याकडे आला व म्हणाला,

'तुम्ही जरा गंमत बघायला चला. झोर्का गॅलॅटेन्कोकडून कसं काम करून घेतोय ते पहा; पण आपल्या अस्तित्वाचा त्यांना सुगावा लागता कामा नये. नाही तर सगळी मजा निघून जाईल!'

आम्ही हळूहळू काम चालू होते त्या बाजूला झुडपाआड जाऊन बसलो. बगिच्याचा एक भाग शीतघर करण्यासाठी राखून ठेवलेला होता. एक बाजू झोर्काने पकडली होती व एक बाजू गॅलॅटेन्कोने पकडली होती. त्या दोघांच्या कामगिरीत कोण कुठे आहे ते बरोबर दिसत होते. झोर्काने बरीच मोठी जागा खोदून तयार केली होती, तर गॅलॅटेन्कोने एक अगदी छोटीशी जागा खोदली होती. फावडे कसेबसे धरून अर्धवट झोपेत गॅलॅटेन्को काम करीत होता. झोर्काचे जराही दुर्लक्ष झालं की गॅलॅटेन्को काम थांबवी. गॅलॅटेन्कोच्या कामचुकारपणामुळे झोर्का अगदी टेकीस आला होता. तो एकदम ओरडला,

'मी काय तुझ्यावर सारखं लक्ष ठेवू? तुझी समजूत काढीत बसू? मला असा वेळ फुकट घालवायचा नाही!'

यावर गॅलॅटेन्कोनं त्याला विचारले, 'पण तुला तरी कोणी एवढं कसून काम करायला सांगितलंय?'

तोंडाने उत्तर न देता झोर्का त्याच्याजवळ जाऊन म्हणाला, 'हे बघ, मी आता तुझ्याशी बोलण्यात वेळ फुकट घालविणार नाही. तू जर काम केलं नाहीस तर तुला जेवण मिळणार नाही व ते कचऱ्यात फेकलं जाईल!'

'वा रे वा! ते काय म्हणून? तू कोण लागून राहिलास? आन्तोनना काय वाटेल?'

'त्यांना काहीही वाटू दे, पण मी सांगितल्याप्रमाणे जेवण फेकून देईन, लक्षात ठेव!'

गॅलॅटेन्कोनं झोर्काकडे निरखून पाहिले. झोर्काने आपल्याला दिलेली धमकी तो खरी करील याबद्दल त्याला शंका राहिली नव्हती.

तो हळूच पुटपुटला, 'बघ, मी काम करतो आहे. तुला दिसत नाही का? मला उगाच सतावू नकोस!' आणि खरोखरच त्याचे फावडे जोरात चालू झाले आणि त्या मॉनिटरने मला कोपराने खूण केली.

मी त्याला सांगितले, 'तुझ्या अहवालात हे नमूद कर!'

त्या दिवशी संध्याकाळी मॉनिटरचा अहवाल असा होता– '३–१ या तुकडीने वोल्कोवच्या नेतृत्वाखाली अतिशय नमुनेदार काम केलं!'

काराबानोवने वोल्कोवचे डोके दोन्ही हातांनी धरले व त्याला सांगितले, 'असा मान दुसऱ्या कोणत्याही मॉनिटरला मिळालेला नाही!'

झोर्का स्वाभिमानाने हसला. गॅलॅटेन्कोपण हसून पुटपुटला, 'आम्ही आज खरोखरच खूप काम केलं!'

त्या दिवसापासून झोर्का खरोखरीच कमालीचा बदलला. त्याने अतिशय उत्तम कामगिरी केली. प्रमुख मंडळाने त्याला नव्या कॉलनीत काम करून घेण्यासाठी पाठवून दिले.

आल्योष्कावोल्कोव हा सर्वांचा फार आवडता होता. तो दिसायला अगदीच ओबडधोबड होता. त्याच्या चेहऱ्यावर निरनिराळ्या रंगांचे डाग होते. त्याचे कपाळ इतके लहान होते की, त्याच्या डोक्यावरचे केस वर वाढण्याऐवजी जणू पुढेच वाढत होते; परंतु तो अतिशय हुषार होता. त्याच्या हुषारीची सर्वांना खात्री पटली होती. संमिश्र तुकडीचा प्रमुख म्हणून तो अतिशय कुशलतेने काम

करी. कामाची आखणी करणे, बरोबर योग्य माणसाला योग्य काम देणे, नवीन कामाच्या पद्धती शोधून काढणे यात त्याचा हातखंडा होता !

कुडल्वीचा चेहरा पसरट आणि मंगोलियन धर्तीचा होता. तो शरीराने सडसडीत होता. तोसुद्धा हुषार मुलांपैकीच एक होता. आमच्याकडे येण्यापूर्वी तो शेतमजूर म्हणून काम करीत असे. त्याला सर्वजण कॉलनीत सधन शेतकरी या टोपणनावाने ओळख असत. कुडल्वी खरोखरच सधन शेतकरी होण्याची शक्यता होती. कारण त्याला एकंदर मालमत्ता, गाड्या, बैल, घोडे, खत, औते वगैरे शेतीला लागणाऱ्या सर्व प्रकारच्या गोष्टींची कमालीची आसक्ती होती. तो कॉलनीत आला नसता तर पक्षाच्या जवळही आला नसता आणि खरोखरच सधन शेतकरी बनला असता. तो तसा संयमी वृत्तीचा, माफकच बोलणारा आणि मालमत्ता जमवण्यात गंभीर प्रवृत्तीचा असा होता. त्याने स्वतः शेतमजूर म्हणून काम केले असल्याने त्याला सधन शेतकऱ्यांचा मनापासून राग होता. त्याचा आमच्या सामुदायिक जीवनावर संपूर्ण विश्वास होता. व एक तत्त्व म्हणूनही तो ते मान्य करीत असे. कालिनासाहेबांचा तो अगदी उजवा हात समजला जात असे. १९२३ च्या अखेरीस आमच्या कॉलनीच्या आर्थिक व्यवस्थेचा बराचसा भाग कुदल्सीवर सोपविण्यात आला.

स्तुपिदसीन ह्रा पण एक व्यवहारी परंतु वेगळ्याच प्रकारचा मुलगा होता. तो खराखुरा कामगारबीजाचा होता. त्याचे पूर्वज खारकोवच्या वर्कशॉपमध्ये पिढ्यानपिढ्या काम करीत आले होते. त्याच्या कुटुंबियांना खारकोवच्या कारखान्यातल्या कामगारांबद्दल अपार आदर होता व १९०५ च्या उठावात भाग घेतल्याबद्दल त्याच्या मोठ्या भावाला हद्दपार करण्यात आले होते. तो दिसायला चांगला होता. त्याच्या भिवया अगदी कोरल्यासारख्या असून डोळे काळेभोर होते. त्याच्या तोंडाच्या दोन्ही बाजूंना, स्पष्ट रेषा होत्या. त्याचा चेहरा एकंदर बोलका वाटत असे आणि चेहऱ्यावरचे भाव फार चटकन बदलत असत. स्तुपिदसीन आमच्या शेतकी खात्यामध्ये महत्त्वाची कामगिरी करीत होता. तसेच आमच्या डुकरांच्या खुराड्यात त्याने लक्ष घातल्याने त्यांची संख्या झपाट्याने वाढत होती. आमची दहावी तुकडी खास डुकरांच्या खुराड्यासाठीच काम करणारी होती व स्तुपिदसीन त्याचा प्रमुख होता. त्याने त्याच्या तुकडीला कामसूपणा शिकविला होता आणि इतर तुकड्यांपेक्षा हे वेगळेपण उठून दिसे. त्याच्या तुकडीतली मुले पुस्तके, पेन्सिली व कागद याशिवाय दिसतच नसत. त्यांच्या डोक्यात डुकरांच्या खात्याचा हिशोब व नियम सदैव घोळत असत. डुकरांच्या सबंध खुराड्यावर त्यांनी आकृत्या व आकडे चितारून ठेवलेले होते. प्रत्येक डुकराचा जणू काही एकेक अहवालच तयार केलेला होता. डुकरांच्या खुराड्यात काय नव्हतं हेच समजणं कठीण होतं !

ह्या पुढाकार घेणाऱ्या मुलांच्या बरोबरीने दुसरा एक त्याच्याबरोबरचाच गट परंतु राखीव असा म्हणायला हरकत नाही. त्यांच्यामध्ये एका बाजूला अतिशय काममू, मुरब्बी, दणकट, शांत, उत्तम काम करणारे परंतु संघटनात्मक पात्रता नसलेले असे होते. यामध्ये प्रिखोदकोव, चोबोट, सारोका, लेशी, ग्लायसर, स्काइंडर, अवच्यारेन्को, वयोरिटो, फेदरेन्को वगैरे वगैरेंचा समावेश करता यईल. दुसऱ्या बाजूला छोट्या मुलांचा नुकताच वाढू लागलेला राखीव असा गट होता. ही मुले आतापासूनच संघटना कौशल्य दाखवायला लागली होती. ही लहान असल्याने त्यांच्या हातात तसा अधिकार देणे जरा कठीणच होते. शिवाय त्यांच्यातली मोठी मुले सत्तेवर होती. ही छोटी मंडळी मोठ्यांना मान देत व त्यांचा आदरही करीत. त्यांना लहान वयात कॉलनीत रहायची संधी मिळाली व तिथल्या रीतीभातींशी मिसळून जाण्याचा लाभ मिळाल्याने कॉलनीचे महत्त्व निर्विवादपणे त्यांच्या मनावर बिंबले. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्यांना जास्त चांगले शिक्षण मिळविता आले. ते आमचे जुने दोस्त-तोका, शेल्यापुसीन, इवेल्वी, बेगीयावेल्स्की आणि यात आणखी काही नवीन नावे—लापोट, शारोवस्की, रोमांचेन्को, नझारेन्को, वेक्सलर वगैरेंची भर पडली होती. आम्ही जेव्हा कुर्यासचा ताबा घेतला त्या वेळी हे सर्वजण कमांडर्स व उत्तम कार्यकर्ते झाले. तशी त्यांना संमिश्र तुकड्यांच्या प्रमुखाची जागा मधूनमधून दिली जात असे.

या कॉलनीतल्या मुलांनी आमच्या सामुदायिकाचा बराच मोठा भाग व्यापला होता. हे सर्वजण पक्के आशावादी, तडफदार, अनुभवी, माहितगार असे होते. त्यांनी बाकी साऱ्यांना आपल्याकडे आकर्षित करून घेतले होते. या सर्वांनी आपणहूनच उत्तम, मध्यम व सामान्य असे तीन गट पाडले होते.

पहिल्या गटातली मुले आपण वाखाणण्यासारखी कामगिरी केलेली आहे असे सांगू शकत नव्हती. कारण आपण कॉलनीचा भाग आहोत याचा त्यांना विसर पडला असावा. कधी कधी यांच्यातून असामान्य व्यक्तिमत्त्व डोकावत असे; पण ते व्यक्तिमत्व कायम स्वरूपाचे नव्हते. नवीन कॉलनीत बऱ्याचदा ही गोष्ट नजरेस आली. आमची लहान मंडळी अगदीच कच्ची समजली जात व त्यांना स्वतःचे नाक साफ करता आले तरी पुरे अशी इतरांची भावना होती. या लहान मंडळींना आपण काही वेगळेच करावे अशी अद्याप उमेद नव्हती. ते निरनिराळे खेळ खेळत. उदा. स्केटिंग (बर्फावर घसरणे), होडी चालविणे, मासे पकडणे वगैरे गोष्टींत समाधान मानत होते. मला वाटते, तेच अगदी योग्य होते.

दुसऱ्या गटात गलावेन्को, परपेलावेन्को, येवगेन्येव, गस्त्रायवन व इतर काहीजण होते. एखादी काही आगळीक झाली तर कॉलनीतील मुले आपणहून या दुसऱ्या गटामध्ये सामील होत असत. उदा. गलावेन्को हा कामचुकार होता. येवगेन्येव हा अतिशय चिडखोर होता. खोटे बोलणारा होता. परपेलावन्को हा सदैव आजारी व सदैव मुसमुसणारा, तर गस्त्रायवन हा परमेश्वराबद्दल खुळचट कल्पना करणारा होता आणि सतत मेरीची प्रार्थना करीत बसणारा मूर्ख होता. या दुसऱ्या गटातल्या मुलांनी बऱ्याचशा या सवयी सोडून दिल्या होत्या; परंतु हे सारे सावकाश चालले होते.

१९२३ च्या अखेरीला आमचे कॉलनीचे सामुदायिक वर वर्णन केल्याप्रमाणे होते. बाहेरून पहाणाऱ्याला सर्वजण सारखेच तरतरीत वाटत; परंतु त्याला काही अपवाद होते. आमच्याकडे आम्ही त्यांना कवायत शिकवलेलीच होती. आमचे बिगुल वाजवणारे चारजण व ड्रम वाजविणारे आठजण पुढे व बाकीचे मागून अशा तऱ्हेने ते कूच

करीत. आमचा स्वतःचा रेशमी व कशिदा केलेला बावटा होता. तो आम्हाला युक्रेनियन लोकसत्ताकाकडून कॉलनीच्या तिसऱ्या वाढदिवसाच्या दिवशी मिळालेला होता.

कामगारदिनाच्या सुट्टीच्या दिवशी आमची मुले ड्रम व बिगुल यांच्या तालावर शहराकडे कूच करीत. शहरातील लोक व प्रतिष्ठित शिक्षणतज्ज्ञ आमची ही पोलादी शिस्त व लयबद्ध चाल यांचे कौतुक करीत. आम्ही नेहमी सगळ्यांच्या शेवटी चौकामध्ये पोचत असू व हात उंच करून बिगुलाच्या आवाजात शहरातल्या कामगारांना सलामी देत असू. मग पुढची व मागची ओळ कायम ठेवून मधली मुले सुट्टीची मजा लुटायला जात असत. आमची ती जागा घ्यायला दुसरे कोणीही धजत नसे. आम्ही कपड्यांची उणीव मोठ्या हुषारीने मारून नेत असू. अनाथ मुलांच्या संस्थांतून सुती गणवेष वापरले जात, तसले आम्ही कधीही वापरले नाहीत; परंतु आमच्याकडे उत्तमोत्तम कपडे नव्हते किंवा चांगली पायतणेही नव्हती. कवायतीला जाताना आम्ही पायात काही न घालता जात असू. आमची मुले पांढरेशुभ्र सदरे घालीत व काळ्या रंगाच्या चांगल्या कापडाच्या पाटलोणी घालीत. त्या गुडघ्यापर्यंत दुमडलेल्या असत व आतल्या चड्डया थोड्याशा दिसत. त्याचप्रमाणे सदऱ्याच्या बाह्याही कोपरापर्यंत दुमडलेल्या असत. अशा तऱ्हेच्या पोषाखात आमची मुले चांगली तरतरीत दिसत.

३ ऑक्टोबर १९२३ रोजी अशाच पोषाखात आमच्या मुलांनी कॉलनीमध्ये कवायत केली. यानंतर एक गुंतागुंतीचे काम आम्ही तीन आठवड्यांत पार पाडले. शिक्षणतंत्रज्ञ व आमचे अधिकारीमंडळ यांच्यात ठरावान्वये आमची गॉर्की कॉलनी नव्या ट्रेपकेवाडीत गेली व आम्ही आमची जुनी जागा सार्वजनिक शिक्षणखात्याच्या हवाली केली. ३ ऑक्टोबरपर्यंत सर्व काही सामान नव्या कॉलनीत हालविण्यात आले. आमची वर्कशॉप्स, घोड्यांचे तबेले, सामानाची भांडारे, शाळा; जेवणघर, स्वयंपाकघर, सर्व काही तसेच आमच्या कार्यकर्त्यांचे सर्व सामानही तिकडे हालविले. ३ ऑक्टोबरला आमचा बावटा, मी व ५० मुले एवढीच फक्त जुन्या कॉलनीत शिल्लक राहिलो !

दुपारी १२ वाजता शिक्षणखात्याच्या एका प्रतिनिधीने जुन्या गॉर्की कॉलनीचा ताबा घेतला आणि आम्ही सारेजण दक्षतेने उभे राहिलो. मी हुकूम दिला,

' बावट्याला सलामी द्या !'

मुलांनी ड्रम व बिगुल वाजविले, बावट्याला सलामी दिली व तो हातात धरून बावट्याच्या पथकाने आम्ही निघालो. जुन्या कॉलनीच्या जागेला आम्ही रामराम ठोकला नाही. कारण आम्हाला तिच्याबद्दल कोणतीही वाईट भावना नव्हती; परंतु आमच्याच्याने मागे बघवतच नव्हते ! आमच्या पथकांनी राटवीतनोये तळ्याच्या बाजूने, आन्ट्रेड कारपोविचच्या अड्ड्यावरून कोलोमॅककडे कूच केले. आम्हीच बांधलेल्या नव्या पुलावरून कोलोमाकच्या हिरव्यागार दरीत वसलेल्या वाडीत प्रवेश केला.

आमचे सगळे कर्मचारी व गोवच्यारोव्का गावातले लोक आम्हाला बघण्यासाठी ट्रेपकेवाडीत जमा झाले होते. तसेच नव्या कॉलनीत असलेले पथक गॉर्की कॉलनीच्या बावट्याला मान देण्यासाठी उभे होते. अशा तऱ्हेने आम्ही नव्या आयुष्यात प्रवेश केला !

# समाप्त

पुस्तके

# गांधी खुनाचा कट

## आणखी एक संशोधन

म. गांधींची हत्या हा 'अखंड' भारताला मोठा धक्का होता. ही हत्या करणारे 'हिंदू' होते; त्यामुळे सावरकरांपासून सर्वच हिंदूंना फार त्रास सहन करावा लागला. गांधींची हत्या पूर्वनियोजित आणि संकलित होती काय? त्यासाठी काटेकोर योजना आखण्यात आली होती काय? त्यात किती जण गोवले गेले? कसे? या प्रश्नांची उत्तरे आजपर्यन्त प्रसिद्ध झालेल्या या विषयावरील साहित्यातून मिळाली आहेतच. तथापि याच विषयावर प्रसिद्ध लेखक श्री. मनोहर माळगावकर यांनी एका नव्या पुस्तकाची ( The men who killed Gandhiji ) निर्मिती केली आणि या पुस्तकाचा मराठी अनुवादही आता उपलब्ध झाला आहे.

गोपाळ गोडसेंच्या 'गांधीहत्या आणि मी' या पुस्तकात सर्व घटनांचा अन्वयार्थ एकाच दृष्टिकोनातून लावलेला दिसतो. याचं एक कारण लेखक त्या प्रकारात सामील होता. त्यामुळे अनुभव व्यक्त करताना तो स्वतःची बाजू मांडल्याशिवाय स्वस्थ बसूच शकत नव्हता. माळगावकरांच्या 'गांधी-हत्येचा कट' या पुस्तकात प्रत्येक घटना तपासून, तावून-सुलाखून त्यावर अनेकांना भेटून, त्यांच्या बाजू, त्यांची छाननी करून एक 'रिपोताज' सादर केला आहे. या पुस्तकाच्या मराठी अनुवादाचे काम प्रा. शिरीष चिंधडे यांनी केले आहे.

दि. ३० जानेवारी १९४८! गांधीहत्या-दिन! हा दिवस भारताच्या इतिहासात लाल अक्षरात लिहिलेला. आज इतक्या वर्षांनी गांधींची हत्या टाळणे शक्य होते काय, या प्रश्नाचं उत्तर 'सहज शक्य होतं' असं मिळत असलं तरी त्या दिवशी मात्र हा प्रश्न धोकादायक आणि गंभीर ठरला असता. गांधींची हत्या करणारे नथुराम गोडसे आणि नारायण आपटे यांच्या डोक्यातील ही कल्पना. या कटात सराईत गुन्हेगारांच्या कल्पकतेचा अभाव होताच; पण संशयाला जागा मिळावी अशा अनेक गोष्टी लक्षात याव्या एवढ्या स्पष्ट होत्या. पण...त्या वेळचे पोलिसखाते हा एक उदंड प्रकार होता! त्यांची कीव करावी तेवढी थोडीच! दिल्ली आणि मुंबई येथील पोलिसखात्याच्या अंतर्गत भांडणांमुळे तपासासाठी योग्य ती पावले उचललीच गेली नाहीत.

'गांधीहत्येचा कट'मध्ये माळगावकरांनी सर्व वस्तुस्थिती पडताळून प्रस्तुत केली आहे. गांधींच्या खुनानंतर एक सदस्य समिती, चौकशीसत्रे, पत्रव्यवहार, व्यक्तिशः आरोपींच्या भेटी-गाठी याद्वारे जी जी वस्तुस्थिती गोळा करता येईल ती ती गोळा करून एकत्रितरीत्या मांडण्याचा प्रयत्न या पुस्तकात श्री. माळगावकरांनी केला आहे.

या खुनाच्या कटात सहा जण सामील झाले होते. नथुराम गोडसे, नारायण आपटे विष्णु करकरे, मदनलाल पहावा, गोपाळ गोडसे व दिगंबर बडगे हे ते सहा जण. पैकी नथुराम आणि आपटे यांना फाशीची सजा तर करकरे, मदनलाल आणि गोपाळ गोडसे यांना जन्मठेपेची शिक्षा झाली. सहावा आरोपी दिगंबर बडगे माफीचा साक्षीदरा बनला.

हा कट राजकीय अन्यायासाठी निषेध म्हणून केला होता. म. गांधींच्या अखंड भारताच्या बाबतीतील कृती यांचा तो सूड होता. हिंदुत्ववाद्यांची अखंड भारताची कल्पना जेव्हा धुळीस मिळाली तेव्हा नथुराम आणि आपटे या कट्टर हिंदुत्ववाद्यांना स्वस्थ बसवेना. पुण्यातील 'हिंदुराष्ट्र' या दैनिकाच्या कचेरीतील टेलिप्रिंटरवर गांधींच्या उपोषणाची बातमी आली आणि आपल्या वृत्तपत्रकचेरीच्या गबाळग्रंथी कार्यालयात बसल्या बसल्या नथुराम व आपटे या 'हिंदुराष्ट्र'च्या संपादकांनी व व्यवस्थापकांनी आपला निर्णय पक्का केला! 'गांधींना खतम केले पाहिजे!' खुनाच्या कटाची सुरुवात इथून होते. अगदी सहजपणे!

या दोघांनी इतर चौघांना हाताशी धरलं. कट रचला गेला. तो अंमलात आणण्याची पहिली वेळ आली, दि. २० जानेवारी रोजी. या दिवशी खुनाचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून मदनलाल पहावाला पकडले गेले. त्याने इतर कुठलीही माहिती दिली नसली तरी 'हिंदू राष्ट्र'च्या संपादकांचा उल्लेख पोलिसांसमोर केला होता; पण दिल्ली आणि मुंबई येथील पोलिसांमधील असहकार्यामुळे कमालीच्या थंडपणाने हे सारेच प्रकरण हाताळले गेले. मदनलालला नथुराम आणि आपटे यांच्याबद्दल विश्वास होता. तो म्हणाला होता—'वो फिर आयेंगे!' पण पोलिस निष्क्रिय राहिले.

या कटात शस्त्रास्त्रे पुरविण्याच्या संदर्भात दादामहाराज आणि त्यांचे धाकटे बंधू दीक्षितजीमहाराज यांचे प्रकरण आले आहे, ते या संदर्भात महत्त्वाचे आहे.

बिर्ला मंदिराच्या प्रवेशद्वाराशी झडती घेऊ नये, असे गांधीजींनी बजावून सांगितले. या मुक्तप्रवेशामुळे दि. ३० रोजी नथुराम आत शिरला. त्या वेळचे वर्णन करताना नथुराम म्हणतो—

'माझ्या हातात पिस्तुल धरून मी गांधींना 'नमस्ते' म्हणालो. माझ्या गोळीबाराच्या माऱ्यात कडमडणाऱ्या पोरीला मी डाव्या हाताने बाजूला ढकलले आणि गोळ्या सुटल्या! अगदी आपोआप! मी दोन गोळ्या झाडल्या की तीन ते मला केव्हाच कळले नाही. 'आ ऽऽ' असा आचका देऊन गांधी खाली कोसळले. हातात पिस्तुल घट्ट धरून मी ओरडलो, 'पोलीस, पोलीस!' मी हे कृत्य भावनातिरेकाच्या झटक्यात केलेले नसून ते पूर्वनियोजित, पूर्ण विचारांती केलेले आहे हे लोकांना समजावे अशी माझी इच्छा होती. मी पळून जाण्याचा प्रयत्न केला किंवा पिस्तुल फेकून दिले असे कोणी म्हणता कामा नये. पिस्तुलासह मी पकडला जाऊ इच्छित होतो; परंतु एकाएकी सारे कसे स्थिर झाले. अर्धा मिनिट तरी कोणी पुढे

सरसावला नाही !' (पृष्ठ–१४९.)

या वेळी करकरे आणि आपटे नथुरामबरोबर होते. नथुराम, मदनलाल आणि करकरे हे त्या विचाराने झपाटलेले तरुण होते आणि त्या ओघातच त्यांच्या हातून ते कृत्य झाले. नथुरामचे शेवटचे पत्र (आपटे व करकरेला लिहिलेले) या दृष्टीने खरोखरच वाचनीय आहे.

'राजकीय अन्यायावर काहीच तोडगा नाही हे पाहून माझे मन आत्यंतिक संतापाने पेटून उठत आहे. म्हणून माझ्यापुरते मी एक आत्यंतिक पाऊल टाकणार असून त्याबद्दल एक–दोन दिवसातच तुम्हाला वृत्तपत्रांतून माहिती मिळेलच. सद्यः परिस्थितीत तरी, आम्ही पाचगणी किंवा दिल्लीत केली तसली निदर्शने निष्फळ ठरतील याबद्दल माझी मनोमन खात्री पटलेली आहे. म्हणूनच कुणावरही अवलंबून न राहता मी जे काय मनाशी योजले आहे ते करणार आहे ! सोबतचा फोटो नीट जपून ठेवावा !'

नथुरामची भूमिका ही अशी व्यक्त झाली आहे. ज्यांना हातात शस्त्र कसे धरायचे हे माहीत नव्हते त्यांनी याच भूमिकेतून हा कट रचला. या प्रकरणी मुंबईचे पोलिस उपआयुक्त श्री. नगरवाला यांचा तपास तर चुकीच्याच मार्गाने चालला होता. या प्रकारात कै. वि. दा. सावरकर यांना कसे जबाबदार धरता येईल याकडे त्यांचे लक्ष होते. या प्रकरणी नेमलेल्या न्या. कपूर आयोगाने तर आपल्या अहवालात 'पोलिसांच्या चौकशीचा दर्जा निकृष्ट होता', असे मत व्यक्त केले आहे.

'गांधीहत्येचा कट' हे पुस्तक म्हणजे एक रिसर्च वर्क आहे याबाबत स्वतः लेखक म्हणतात, 'माउंटबॅटन यांचे भारतात आगमन झाल्यापासून लाल किल्ल्यातील गांधीखून अभियोगाच्या अखेरीपर्यंत माझे वास्तव्य दिल्लीत होते. ज्या बिर्ला मंदिरात हत्या झाली त्यापासून शेजारच्या बंगल्यापलीकडील इमारतीत मी रहात होतो.'

पुस्तक वाचताना काही नव्या गोष्टींचा उलगडा होतो. नथुराम व आपटे यांच्या वैयक्तिक जीवनातील बारकावे व त्यांचे व्यक्तिचित्रण यामुळे त्यांच्या या कृत्यामागील भूमिका अधिक स्पष्ट होते.

अनुवाद प्रा. शिरीष चिंधडे यांनी केला आहे. एकूण पुस्तकात फारच सुटे सुटे भाग झाले आहेत. हा दोष कुणाचा, हा प्रश्न नाही; पण मराठी भाषेचा 'मुक्त' वापर चिंधडेंनी पुस्तकाच्या अनुवादात केला आहे.

रत्नागिरीला 'झोपाळू खेड' (पृ. ३०), सावरकर हे स्थंडिलवत तेजाळणारे एक देशभक्त होते, (पृ. ३१) गोपाळ पाच फूट आठ इंच आहे म्हणजे फार उंच नव्हे, बडगे मात्र जेमतेम पाच फूट आहे (पृ. १०९) अशा अनेक शब्दांबाबत झालेल्या चुका ठिकठिकाणी दिसून येतात. मजकुराच्या सलगतेचा अभाव आणि अनुवादाची आकर्षकहीनता यामुळे हा एक इतिहास झाला आहे.

पुस्तकात या कटाच्या संदर्भात सावरकरांचे समग्र चरित्र, हिंदुमहासभेचा वृत्तान्त, ग्वाल्हेर संस्थानचा इतिहास अशा गोष्टी नको इतक्या सविस्तरपणे येतात. 'रिपोताज' म्हणून हे पुस्तक वाचनीय आहे. शिवाय गांधीहत्येचा त्रयस्थ व्यक्तीने वस्तुस्थिती समोर ठेवून घेतलेला एक शोध म्हणूनही हे पुस्तक वाचनीय आहे.

–मुकुंद संगोराम

**गांधीखुनाचा कट**
मूळ लेखक : मनोहर माळगावकर
अनुवाद : प्रा. शिरीष चिंधडे
प्रकाशक : अस्मिता प्रकाशन,
पृष्ठे : १७७, मूल्य १५ रुपये.




**लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे ३० । मूल्य : २० रुपये**

# एका घटनेला अर्थ नव्हता !

दिलीप पांडुरंग करमरकर

हा दाटलेला अंधार कसा मऊसूत वाटतोय–सहाणेवर मात्रा उगळून जास्त थंडगार पिठूळ ओलावा रहातो तसा ! हे शरीर कसं पिसासारखं हलकं वाटतंय–भुरूभुरू उडणारं ! या शरीराला काही ओझंच नसावं बहुतेक ! तिच्या कपाळावरचा घामट ओलावा तिला जाणवला. तिला तो ओलावा आवडला. तो तसाच रहावा–त्याचा स्पर्श सारखा व्हावा असंच तिला वाटू लागलं.

पण तो दाटलेला अंधार म्हणजे असंख्य सिगरेटींचा कोंडून राहिलेला धूर आहे असं त्याला वाटत होतं. त्याची छाती अजूनही धपापत होती. नाही म्हणायला उद्वेग बराचसा निवला होता. डोक्यावरचे उभट खुरटे केस आता चिवचिवत नव्हते. त्याचं शरीर अजूनही धगधगत होतं. मन बेलगाम हुंदडत होतं. नजरेसमोर भुतं नाचत होती. त्याला वाटलं स्वतःचं शरीर म्हणजे दुसऱ्या मजल्याला लागलेली आग आहे. तिसरा मजला नुकताच धुमसू लागलाय, पहिला मजला अनिश्चिततेच्या धुरानं काळवंडून गेलाय !

एका अंगठ्यावर शरीर तोलून वर्ष वर्ष नुसताच उभा रहाणारा एखादा तापट साधक त्याला आठवला. जमीन आकाशाच्यामध्ये अस्ताव्यस्त लोंबकळणाऱ्या त्रिशंकूची उगीचच आठवण झाली. काहीही कारण नसताना तो आरवताना कोंबड्याला त्रास होतो की नाही, याचा विचार करू लागला. मादक मन्रोच्या आठवणीनं त्याला जरा बरं वाटलं. जमिनीतून वर उगवलेल्या झाडांवर दातओठ खाऊन घाव मारणाऱ्याच्या दंडातील फुगलेल्या शिरा त्याच्या नजरेसमोर उडू लागल्या.

¤

हा असा का घुम्यासारखा विझून पडलाय...यानं काही तरी हालचाल करावी... तिला त्याचा खूप राग आला. तो नेहमीच नंतर असं करायचा आणि नेहमीच त्याचा तिला राग यायचा. ती कुशीवर वळली.

अचानक त्याला तिचं हालणं जाणवलं. तिचं अस्तित्व काटेरी फण्याप्रमाणे त्याला बोचलं. तिचा हात मात्र त्याच्या छातीवर होता. आपल्या छातीवर मणामणाचं ओझं ठेवलंय असं त्याला वाटलं. अगदी विचित्रपणे त्याला करंगळीवर पर्वत तोलणारा आठवला. आता मात्र त्याला स्वतःला खराखुरा राग आला. झोप का येत नाही याचा तो विचार करू लागला. त्याला झोपेत तर सारखी स्वप्नंच पडायची; पण जागेपणीसुद्धा नको त्या वेळेला नाही ते विचार त्याच्या मनात यायचे.

परत त्याच्या गर्भात नुसता तडफडाट होऊ लागला. मन चिडचिडलं. तो विझू लागलेला अग्नी परत उसळू लागला. तिला त्याच्यात होणारा फरक कळत नसला तरी जाणवत होता. ती मोहरली. तिला वाटलं ते दोघेजण मऊ हिरव्या रेशमावर पडलेत. वर चांदण्यांचा घमघमाट चालू आहे. रातराणी हळूचकन् डोळे मिचकावतोय. एक शरीर दुसऱ्या शरीराला खुणावतंय. स्वतःशीच हसतंय....लाजतंय! आता मात्र त्याला तो भडका असह्य झाला. तो कुशीवर वळला. त्याने तिची बोटं घट्ट धरली. परत तिच्या कपाळावर ओलसर घाम साचू लागला.

सकाळी देखील तो रागावलेलाच होता. पूर्णउंचीच्या आरशासमोर तो उभा राहिला. तो स्वतःच्याच शरीरावर विलक्षण चिडला. त्याने जरा जोरातच दात घासले. खळखळून चूळ भरली. टबमध्ये सुगंधी द्रव्य टाकलं. रक्त येईपर्यंत ब्रशानं शरीर घासलं. शेवटी अंग हुळहुळायला लागलं. चेहरा लालेलाल झाला. त्याने डोक्यावर भरभरून शांपू लावला. घासून घासून डोकं स्वच्छ धुऊन टाकलं. आता त्याला स्वच्छ वाटू लागलं. तसा तो अस्वच्छ कधीच नव्हता. त्याचा चेहरा नेहमीच गुळगुळीत असायचा. केसांना मंद सुवास यायचा. अंगाला कधीच घामट दर्प यायचा नाही. कपडे पांढरेशुभ्र असायचे. दात चकचकीत असायचे. तो बोलायचा देखील हळुवार...मृदू... थंड..थंड ! त्याला राग आला तरीदेखील त्याची नजर तशीच स्निग्ध रहायची.

¤

म्हणूनच तो बुचकळ्यात पडायची. दहा वर्षं झाली तरी तिला अजून वाटायचं की तो तिच्यापासून काही तरी लपवून ठेवतोय. बाथरूममधील पूर्ण उंचीच्या आरशासमोर उभं राहून ती स्वतःकडेच बघत राहिली. तिला स्वतःचं शरीर फार आवडायचं. ती त्याची नीट जोपासना करायची. मोती निसटू नये म्हणून दोन शिंपल्यांनी मिठी मारावी तितक्या आवेगाने तिने दोनही डोळे घट्ट मिटून घेतले. तिला हवाहवासा वाटणारा त्याचा स्पर्श ती साठवू लागली. टबामधील पाण्यात ती बराच वेळ पडून राहिली. तिला ते पाणी देखील रात्रीच्या अंधाराप्रमाणे मऊसूत वाटत होतं. तिला त्याची चिडचिड कधीच जाणवली नव्हती. जरी जाणवली असती तरी देखील तिला कारण कळलं नसतं !

खुर्चीत बसून तो सिगरेट ओढत होता. तो तिची वाट पहात होता याचा अर्थ तिच्याशिवाय त्याला करमत नव्हतं असं मुळीच नाही, तर ती त्याची सवयच होती.

ती टबमधून उठली. हळुवारपणे तिनं आपलं शरीर टर्किश टॉवेलनं टिपलं. अंगावर नुसता गाऊन चढवून ती आली. नोकरानं ब्रेकफास्ट आणून ठेवला होता. केवळ सवयीनं तिने त्याच्यापुढे टोस्ट

आणि चहाचा कप सारला.

तिला आश्चर्य वाटू लागलं. काल रात्री तिला त्याच्याविषयी जी ओढ वाटत होती तिचा मागमूसही आता तिच्या मनात उरला नव्हता. हा असला जीवघेणा, न कळणारा दुरावा केव्हापासून निर्माण झाला हेच तिला आठवत नव्हतं.

□

तो निघून गेला. नोकरानं टेबल साफ केलं. ती आपल्या रूममधे गेली. तिनं फॅन सुरू केला. त्या फॅनचा वारा पातळ गाऊनमधून तिच्या शरीराला झोंबू लागला आणि ती अचानक खिन्न झाली. आकसून गेली. तिचं फुलारलेलं शरीर एकदम कोमेजून गेलं. तिला आठवलं– नको असताना आठवलं– एक मांसल गोळा! अजून आकार फुटला नव्हता त्या गोळ्याला! रक्तानं माखला होता. अजून कोणीही त्याच्या कानात फुंकर मारलेली नव्हती.

एक–दोन वर्ष काळजी घ्या म्हणून डॉक्टरांनी सांगितलं होतं; पण आता उणीपुरी सहा वर्ष उलटून गेली होती.

ती हादरून खचली! तिच्या हाता-पायातलं त्राणच निघून गेलं. तिचं विचार करणारं मन फ्रीजमधील बर्फाच्या कप्प्यात जाऊन निमूट गोठलं.

□

धाक दाखवल्यावर जसं एखादं लहान पोर गप्प बसतं तसे त्याचे दोन–तीन दिवस संपून गेले. त्याला त्याच्या साहेबाचा फार राग यायचा. साहेबाच्या डोक्याला पडलेलं पूर्ण टक्कल त्याला मुळीच आवडायचं नाही. साहेब तसा हुषार होता. आपल्या कामामधं बॉस होता; पण त्याचे डोळे निस्तेज गारगोटीप्रमाणे होते. जाडच्या भिंगां-मधून साहेब जेव्हा त्याच्याकडे रोखून बघायचा तेव्हा त्याच्या मणक्यातून कसली तरी जीवघेणी कळ यायची. कोणी तरी थंडगार बर्फाळ हवेनं आपल्याला झाकून टाकतंय असली विचित्र समजूत त्याच्या मनात रिंगण धरायची. आपल्यामधे काही तरी बदललंय याची त्याला जाणीव होती. सगळं काही नीट करूनदेखील काही तरी अपूर्ण रहातंय अशी जाणीव त्याला पछाडून टाकत होती.

□

गेल्या दोन–तीन दिवसांत त्याचं लक्ष एका भिकाऱ्याकडे वारंवार जायचं. तो भिकारी त्याच्याच इमारतीच्या खाली उभा असायचा. त्याने त्या भिकाऱ्याला एक-दोन वेळ मोठी भीकही घातली होती; पण तो भिकारी त्याला साधा नमस्कारही करायचा नाही. आपल्या इमारतीत बाहेरून आत किंवा आतून बाहेर जाताना त्याची छाती अकारण धडधडायची. या लाचार नसलेल्या भिकाऱ्याशी आपला काहीच संबंध नाही हे तो उगीचच स्वतःलाच वारंवार पटवत रहायचा.

□

कालच त्याने आईला मनीऑर्डर केलेली होती. त्याच्या पत्नीचं आणि त्याच्या आईचं कदाचित पटणार नाही या दूरदर्शी विचारानंच त्याने दोघींना एकमेकींपासून दूर ठेवलेलं होतं. त्याच्या आईनं तीन-चार वर्षांपूर्वी त्याच्या घरी येऊन बरीच चिडचिड केलेली होती. त्याच्या पत्नीशी तर ती चक्क भांडून गेली होती.

आत्तादेखील ते भांडण आठवताच तो प्रचंड अस्वस्थ झाला. तो



त्याच्या साहेबासमोरच बसलेला होता. साहेबाची निसरडी नजर त्याच्यावर खिळलेली होती. 'आरंच्यू फिलीन वेल?' साहेबानं आपुलकीनं विचारलं. 'ओ. नो.' त्यानं स्वतःला सावरलं. 'आय मीन... आय अॅम् फिलीन् फाइन्!'... त्याच्या या उत्तरावर साहेब काहीच बोलला नाही. नंतर दिवसभर त्याला आपल्याला कुणी तरी एखाद्या कुंडीत अडकवलंय असं वाटत होतं. त्या दिवशी त्याच्या हातून बऱ्याच चुका झाल्या; पण साहेब काहीच बोलला नाही. साहेबाच्या त्या दयाळू वृत्तीबद्दल त्याने मनातल्या मनात आभार व्यक्त केले.

कसेबसे संध्याकाळचे पाच वाजले. त्याने सुटकेचा निःश्वास सोडला. इतक्या लवकर घरी जाऊन काय करायचं हा प्रश्न समोर उभा राहिला. त्यानंतर तो वणवणा हिंडला. किती चालला, कुठे गेला, काय खाल्लं हे त्याचं त्यालाच कळत नव्हतं. हॉटेलचं बिल देताना त्यानं उगीचच पैसे काउंटरवर आदळले होते. टॅक्सीला थांबवताना त्याचा आवाज मोठ्ठा झाला होता. चालताना त्याची पावले अकारण जमिनीत ठामपणे रुतत होती.

¤

पहाता पहाता संध्याकाळ ओसरली. त्यानं घड्याळात पाहिलं. साडेनऊ झाले होते. 'माय गॉड...ती वाट पहात असेल...' तो घाईघाईने दहाच्या सुमारास घरी आला.

रात्रीच्या वेळी तो नेहमीचा भिकारी तिथे असण्याची शक्यता नव्हतीच. त्याला जरा हायसं वाटलं. तिला काय सांगावं याचा विचार करत त्यानं बेल वाजवली. कुणीच आलं नाही. त्यानं दुसऱ्यांदा बेल वाजवली. तरीही ती आली नाही. ती निश्चितच चिडलेली असणार याविषयी त्याची खात्री पटली. त्यानं तिसऱ्यांदा बेल वाजवली. परत तोच प्रकार. आता मात्र त्याला काळजी वाटू लागली. आपण उगीचच एवढा उशीर केला हा विचार त्याच्या मनात आला. आता त्याच्या चेहऱ्यावर फेरफार होऊ लागले. मनातली चिडचिड ठुसठुसू लागली. तो चौथ्यांदा बेल वाजवणार एवढ्यात दार उघडलं गेलं. त्याने तिच्याकडे पाहिलं. त्याला आश्चर्याचा धक्का बसला. त्यानं तिला पूर्वी अशी कधीच पाहिली नव्हती. तिचा असा चेहरा कधीच पाहिला नव्हता.

¤

नाही! तिचा असा चेहरा त्याने मागे एकदा पाहिला होता. त्यांच्या लग्नाच्या पहिल्या रात्री तिचा चेहरा जेव्हा त्याने आपल्या हातांच्या ओंजळीत धरला होता तेव्हा तिचा चेहरा असाच दिसत होता. तृप्त...समाधानी! डोळे विलक्षण तेजाळलेले होते. गोबऱ्या गोबऱ्या गालांवर कुठली तरी सुखद भावना मेंदीचा रंग घेऊन उतरलेली होती. ओठांच्या कडांवर कायमचं खिळलेलं अस्फुट हास्य होतं.

तो आत गेला. तिनं दार लावून घेतलं.

'जेवणार आहेस?' तिनं विचारलं. त्याने मानेनेच 'नाही' सांगितलं. ती शांतपणे बेडरूमकडे गेली. त्याला क्षणभर त्या सोनेरी मऊमऊ दिवसांची आठवण झाली; पण ती क्षणभरच. त्याने बॉश घेतला. गरम कॉफी स्वतःच करून घेतली. बेडरूममधे जाताना त्याला गोंधळून गेल्यासारखं वाटत होतं. ती बेडवर बसून त्याच्याकडे एकटक पहात होती. भगभगीत उन्हाळ्यातील डेरेदार वृक्षाच्या सावलीप्रमाणे तिचा चेहरा निवलेला होता.

तो अस्वस्थ झाला. मनातली चलबिचल चेहऱ्यावर न दाखवण्याचा आटोकाट प्रयत्न करीत तो तिच्याजवळ येऊन बसला. रूममधलं वातावरण संथ झालंय असं त्याला वाटत होतं; पण त्या स्तब्धतेत काहीही तुंबलेलं नाही याची जाणीव त्याला झाली. त्याच्या मनावरचं दडपण बरंचसं हलकं झालं. बराच वेळ कुणीही कुणाशी बोललं नाही. मंद फिक्कट निळ्या बेडलॅम्पच्या भोवती रात्र साचून राहिलेली होती. कुणी तरी झपाटून टाकल्यासारखा तो शांत बसून होता.

¤

ती स्वस्थ होती. स्थिर होती. तिचा निवलेला चेहरा समाधानी दिसत होता. तिची नजर चमकत होती. तिने हलकेच त्याच्या छातीवर डोकं ठेवलं. तिच्या मऊशार केसांमधून हात फिरवावा असं त्याला तीव्रतेने वाटू लागलं. तिने त्याच्या कानाजवळ ओठ नेले. ती जे काही पुटपुटली ते ऐकून त्याचा स्वतःच्याच कानांवर विश्वास बसेना.

कुणी तरी येणार होतं! एक लहानगा जीव ते घर भरून टाकणार होता. त्या अर्धवट विस्कटलेल्या मांसल गोळ्याची जाणीव वेगाने विरत होती.

त्याला आश्चर्याचा धक्का बसला. काय झालं होतं कुणास ठाऊक' पण आता त्याच्या मनातील उद्वेग पूर्णपणे वितळलेला होता. आता त्याला त्याच्या बॉसचा राग येणार नाही अशी खात्री वाटू लागलेली होती. तो नेहमीचा भिकारी आता त्याच्यावर कुठलाही परिणाम करणार नव्हता. त्याने एकदा परत तिच्याकडे पाहिलं. तो विचारणार होता, 'खरंच?'...पण तिची नजर मिटलेली होती. जणू काही तिला त्याचा प्रश्न ऐकू आला. तिच्या पापण्या उलगडल्या. नजर मंद-मंद रातराणीसारखी हसली.

¤

त्यानंतर ती रात्र तशीच हळुवार लयबद्ध चढत गेली. त्या रात्रीचा अंधार तिच्याप्रमाणेच त्यालादेखील मऊमऊ वाटत होता.

□

# श्री भगवान उवाच

### श्री अर्जुन उवाच

अर्जुन म्हणे महाराज
कषायपानासमवेत आज
वाचत होतो वृत्तपत्र ताजं
भल्या प्रभाती।

आधी एकूण पानं आठ
त्यातही जाहिराती साठ
उर्वरित स्थळी बातम्यांची वाट
लावली असे।

त्यातही कोणी पडले, मेले
कोणी मरता मरता वाचले
आणि कोणी कोणा भोसकिले
हेच जास्त।

कोणी स्टोव्हवरी पडे
कोणाची आत्महत्या घडे
कोणी एकमेका पाडे
राजकारणी।

हरवले कोणी, कोणी सापडे
मृतात्म्याच्या स्वभावाचे पवाडे
जळकी दुकाने, घरे आणि वाडे
व्यापती जागा।

परदेशातील घटना अद्भुत
भाषांतरुनी स्तंभ आणि स्फूट
अग्रलेखामधी घालूनी कूट
उद्योग कुणाचे।

भयंकर परी हल्ली घडतसे
फासावरती रोज चढतसे
कुणी ना कुणी, सतत वाढतसे
संख्या त्यांची।

अवनीवरती अनेक देश
विविध भाषा, विविध वेष
कुठे लोकसत्ता, कुठे सत्ताधीश
सतत राहती।

अशाच एका प्रसिद्ध देशी
दिले पंतप्रधाना फाशी
दया-विनवण्या लाथेसरशी
झुगारुनी।

किंवा दुसरा देश इराण
क्रांतीसाठी घेती प्राण
वेचूनी शत्रू आता मारणं
रोज तेथे।

भारतातही दृश्य हेच
केली ज्यांनी कृत्यं नीच
फाशीविना ना शिक्षा काहीच
दिधली त्यांना।

सर्व संस्कृती पार बुडवूनी
धर्म अन् नीती पायी तुडवूनी
माणुसकीला पुरे गाडूनी
न्याय हा देती।

वा किंवा सूड घ्यावा
प्राण घेणाऱ्याने प्राणच द्यावा
हाच एक न्याय ठावा
जनांना येथल्या।

सांग श्रीहरी कसे हे घडते
नाही कुणी कसे त्यां अडवते
कुणी नाही थोडेही लढते
जीवांसाठी त्या।

### श्री भगवान उवाच

भामेनेही आज सकाळी
वाचली ती चौकट काळी
कोण जन्मा येई, कुणा पाश आवळी
अंधारात।

खेदही झाला पार्था मज याचा
शेवट व्हावा ऐसा त्यांचा
कुंठितही झाली माझी वाचा
ऐकुनी सारे ।

पण माझा मीच करी विचार
का व्हावे ऐसे, का घडावा हा आचार
कोण दुराचारी, कोण झाले लाचार
प्रसंगात या ।

घडणे हे परी होते अटळ
गर्जनेनंतर जसे कोसळावे जळ
किंवा उठावी काही वावटळ
तैसेच हे ।

किंवा झाकलेला कुठे निखारा
लागावा त्याला थोडासा वारा
पेटून उठावा आसमंत सारा
तैसेच हे ।

किंवा कोंडलेली वाफ भांड्यात
घट्ट झाकणाखाली साठत जात
स्फोट व्हावा त्याचा आतल्या आत
तैसेच हे ।

किंवा फार सहन केले जर
घडेपर्यंत अपराध शंभर
परिणाम असाच भयंकर
होतसे त्याचा ।

असंस्कृतास कसली संस्कृतता
अमानुषास कसली मानवता
निर्दयास वा कसली दयार्द्रता
दाखवावी ।

कोणीही कोणाचा मारावा बाप
कोणीही करावी कितीही गळेकाप
तरी प्रेम देऊनी वाढवावा साप
हे कैचे ।

आहे कोणी मोठा नेता प्रज्ञावंत
दृष्टी ज्याची जाई भेदुनी अनंत
डोलती ज्याच्यापुढे संत आणि पंत
सारखेच ।

म्हणूनी काय काहीही करावे
कोणा किताब द्यावे, कुणाचे प्राण घ्यावे
सत्तापदी कोणा, कोणा दूर सारावे
स्वेच्छेनुसार ।

वा केवळ आहेत तरुण
जायाचे आयुष्य सारे अजून
दाखवावी दया न्याय डावलून
त्या क्रूरांना ।

का मृतांना देऊनी न्याय
आता त्याला अर्थ काय
विचार हा भरून न्हाय
मन तुझे ।

सुधारण्याची द्यावी एक संधी
म्हणे नवविचाराची नांदी
तूही झालास त्याचाच बंदी
कुटिलालकमस्तका ।

दहा जीवांना मारती जे दुष्ट
दुराचारी जे विवेकभ्रष्ट
मेले जर ते का होती कष्ट
तव मना ।

दया, क्षमा, शांती शब्द हे गोड
भरल्या पोटी मुखावाटे सोड
नाही त्यांना स्वानुभवाची जोड
वायाच सारे ।

ज्याचे जळते त्याला कळते
जलदामधूनच पाणी गळते
मातेची वेदना तिलाच छळते
रात्रंदिन ।

तू मी काय माराव्या गप्पा
बुद्ध, ख्रिस्त, गांधी थकले बाप्पा
गाठता मानवतेचा हा टप्पा
आयुष्यात ।

आठव काय कुरुक्षेत्री केले
काय तुवा मी तेथ सांगितले
काय त्याचे अन् फळ मिळाले
आठवी सारे ।

बंधू, गुरू, योद्धे महान
युद्धक्षेत्रावरी सारे समान
पापी दुर्योधन, दु:शासन जाण
ठारचि मारावे ।

ना देण्यास लायक शिक्षा देणाराही
म्हणूनी पापाचा भार कमी नाही
कृत्यानुसारच भोग आले काही
विषाद कसला ।

आपण जर ना ऐसे केले
जगामध्ये बहु दुर्जन माजले
जातील कुठे जन ते भले
सांग तूचि ।

–सतीश कामत

चित्रपट परीक्षण । सदानंद बोरसे

# प्रेमबंधन

## हरवलेल्या अडीच महिन्यांच्या शोधात

शेठ मोहन खन्ना मुंबईचा एक प्रसिद्ध उद्योगपती. तो स्वतःच्या खाजगी विमानाने एकदा प्रवासास जात असतानाच विमानाने अचानक पेट घेतला. विमानाच्या पायलटचा– जोसेफचा आवाज, 'सर, लाईफ जॅकेट बांधा!' आणि मोहन लाईफ जॅकेट बांधत असतानाच–

धडाड् धाड!

त्यानंतर अडीच महिन्यांनी एका हॉस्पिटलमध्ये मोटार-अपघातात जखमी झालेला एक माणूस शुद्धीवर आला. तो स्वतःला मोहन खन्ना म्हणू लागला आणि खरोखरच तो मोहन खन्ना होता.

'मोहन विमान अपघातात मेला,' असेच समजून दुःख करणाऱ्या मोहनच्या आईला, बहिणीला आणि नियोजित वधूला हे कळल्यानंतर आत्यंतिक आनंद झाला; पण मोहन मात्र अस्वस्थ होता.

लाईफ जॅकेट बांधत असताना बेशुद्ध झाल्यापासून मोटार-अपघातात शुद्धीवर येईपर्यंतच्या अडीच महिन्यांच्या काळात काय घडले, हे जाणून घेण्यासाठी तो उत्सुक होता. आपल्या आयुष्यातील हा हरविलेला अडीच महिन्यांचा तुकडा शोधून काढून तो त्याला स्मृतीच्या साखळीत पुन्हा जोडायचा होता.

ही अशी कथा असलेला 'प्रेमबंधन' जर या कथानकाशी म्हणजेच या हरवलेल्या आयुष्याच्या शोधाशी प्रामाणिक राहिला असता, तर कदाचित एक अत्यंत सुंदर चित्रपट तयार झाला असता– कदाचित हा शोध म्हणजे एखादी गूढकथा बनली असती, कदाचित एखादा रहस्यपट जन्माला आला असता, कदाचित संपूर्ण चित्रपटात या शोधात अडकत जाणाऱ्या मोहन खन्नाचे मनोविश्लेषण आले असते. ही कदाचितची यादी बरीच वाढवता येईल; यातील कोणत्याही एका 'कदाचित'चा आधार घेऊन आणि त्याच्याशी प्रामाणिक राहून एक सुंदर कथानक उभारता आले असते. आजपर्यंत 'अमरदीप'पासून 'साँज और सवेरा'पर्यंत अपघात, त्यामुळे जाणारी स्मृती, पुन्हा अपघात, त्यामुळे पुन्हा येणारी स्मृती ही कल्पना कित्येकदा उगाळून झाली होती. तीच कल्पना पण एका अगदी वेगळ्या दृष्टिकोनातून मांडण्याची संधी 'प्रेमबंधन'मधून मिळाली असती; पण हा वेगळा दृष्टिकोन संपूर्णतया मोडून टाकून पुन्हा एकदा जुनीच शिळकट कळकट भेसळ 'प्रेमबंधन'मधून मिळते.

प्रेमबंधनाची सुरुवात होते तीच स्मृती हरवलेल्या मोहन खन्ना (राजेश खन्ना) पासून. मग अडीच महिन्यांत तो किसन बनून संथाळांमध्ये राहतो, महुआ (रेखा) नामक संथाळ पोरीशी लग्न करतो. नंतर पुन्हा अपघात झाल्यावर तो मोहन खन्ना बनून मुंबईला निघून जातो. त्याच्या शोधात महुआ मुंबईला पोहचते; तर मोहन व वीणा (मौशमी चटर्जी) यांची सगाई वगैरे सुरू असते. मग अनेक योगायोग घडून अखेर वीणा मोहन व महुआचे मीलन घडवून आणते. या शेवटच्या एका दगडात तर (१) वीणाच्या रूपाने भारतीय त्यागी नारीचे दर्शन, (२) खरे प्रेम ईश्वरापेक्षा श्रेष्ठ आहे, (३) अग्नीच्या साक्षीने पती–पत्नी म्हणून स्वीकारलेले बंधन व विवाहसंस्थेचे पावित्र्य, (४) लक्षाधीश उद्योगपती व गरीब आदिवासी यांच्या प्रेमातून दिसणारा समाजवाद, (५) आदिवासींचा उद्धार, (६) सत्यमेव जयते इत्यादी अनेक पक्षी मारून टाकले आहेत. शिवाय या सगळ्याच्या जोडीला मोहनच्या अनुपस्थितीत झालेली एक पाच लाखांची अफरातफर, ती लपविण्यासाठी त्याच्यापुढे उभी केलेली एक खोटीनाटी तरुणी (अडीच महिने बहीण बनून त्याला सांभाळल्याचा ती दावा करते.), एक कोठी नृत्य असला भंकस मालमसाला चित्रपटाला ठिगळला आहे. या संपूर्ण लफड्यात ए. के. हनगल यांनी खलनायकगिरी करून चित्रपटातील विनोदाची बाजू सांभाळली एवढेच या मसाल्याचे वैशिष्ट्य. मोहनच्या मेंदूतील 'त्या' अडीच महिन्यांतील स्मृतिकेंद्रे एखाद्या पुसटशा हेलकाव्याने जागी होत आणि तो किसन बनत असे–असे तीन प्रसंग चित्रपटात आहेत; पण संपूर्ण चित्रपटातील कथेच्या एकूण सरळसोट मांडणीमुळे आणि मागे उल्लेख केलेल्या ठिगळांमुळे या प्रसंगांचा प्रभाव अजिबात पडत नाही.

'प्रेमबंधन'नंतर 'Reincarnation of Peter Proud' या चित्रपटाची प्रकर्षाने आठवण झाली. काही मूठभर दुव्यांवरून आपल्या पूर्वजन्माचा काढलेला माग त्यात जसा अतिशय उत्कंठावर्धक बनला होता, तशाच रीतीने कथानकाची मांडणी करून 'प्रेमबंधन'ही बनविता आला असता. अर्थात तो प्रेक्षणीय बनविण्यासाठी कथेच्या मांडणीच्या अनेक पद्धतींपैकी आणि कथेकडे पाहण्याच्या अनेक दृष्टिकोनांपैकी ही एक पद्धत वा हा एक दृष्टिकोन. अन्यही पद्धतीने मांडणी करून त्यात रस भरता आला असता; पण आत्यंतिक सरळसोट व कालानुक्रमे घेतलेल्या मांडणीमुळे आणि त्याहीपेक्षा सामान्य अशा मालमसालामय कथानकामुळे एक चांगले कथासूत्र 'प्रेमबंधन'मध्ये वाया घालवले आहे.

दिग्दर्शक रामानंद सागर यांचीच पटकथा

असल्यामुळे मांडणीचा आधी सांगितलेला दोष त्यांच्याच पदरात बांधावा लागतो. नाणावलेले धंदेवाईक दिग्दर्शक असल्यामुळे चित्रपटात भरपूर दोष आहेतच. त्यांनी चित्रपटाच्या पूर्वार्धात दाखविलेली अत्यंत sophisticated संथाळ वस्ती हा सर्वांत ठळक दोष. रंगीबेरंगी मणीदार पोषाख, सुरेख सजावटीच्या चित्रविचित्र बनावट झोपड्या, 'कृष्ण ही प्रीतीदेवता' मानणारे तुपात तळलेले, साखरेत घोळलेले मऊ गुलगुलीत आदिवासी असे हे संथाळी जीवन पाहिल्यावर हसावे की रडावे तेच कळत नाही. हे संथाळी आयुष्य संपवून किसन पुन्हा सेठ मोहन बनला की, मग रहस्य, काश्मीर, बागा, गाणे इत्यादी मसाला भरला जातो.

चित्रपटाच्या श्रेयनामावलीत, मध्यंतराच्या वेळी आणि 'समाप्त'ला मागे पार्श्वभूमी म्हणून घेतलेली आकृतिचित्रे फक्त सुरेख होती.

संपूर्ण चित्रपटात रेखा आणि अगदी क्वचित राजेश खन्ना अभिनय करण्याचा प्रयत्न करतात. त्यातही राजेश खन्नाचा बावळट किसन, ललिता पवारची कायम किंचाळणारी आई हे चित्रपटातील हनगलमारखे आणखी काही विनोदी नमुने.

चित्रपटाचे गीतकार आनंद बक्षी. एकदा संथाळ आदिवासींना शुद्ध शाकाहारी बनविण्याची दिग्दर्शकानेच पूर्ण मुभा घेतल्यानंतर आणि परवानगी दिल्यानंतर बक्षीसाहेबांनी 'होती है किसीसे जब प्रीत, जनम लेता है कोई नया गीत' असे झक्क गाणे त्यांच्या तोंडात कोंबले आहे – तेही संथाळ लोकांचे लोकगीत म्हणून. त्याबरोबरच 'आमली की टामली, टामली के गाँव में, साँवली-सी छाँव में, श्यामली के पाँव में बिछू काट जाता है, तो शोर मच जाता है' असली निरर्थक बडबड गीतेही संथाळ मुलींना म्हणायला लावली आहेत.

आता एवढे झाल्यावर संगीतकार लक्ष्मीकांत-प्यारेलाल गप्प बसतील होय? त्यांनीही संगीताचे दोन हात चित्रपटावर चालवून घेतले.

एकूणच भिन्न भिन्न रुचीच्या आबालवृद्ध स्त्री-पुरुष प्रेक्षकांची 'जो जे वांछील तो ते लाहो' ही इच्छा पुरवताना रामानंद सागर यांनी माझे जे अडीच तास हरवून टाकले, त्याचा शोध घेण्याचे काम आता मी चालवले आहे. □

---


हे पुस्तक प्रत्येक ग्रंथालयात जाईल अशी व्यवस्था करण्यासाठी शासनाने आवर्जून प्रयत्न करावेत.

( रविवार केसरी दि. १० सप्टेंबर १९७८ )

–डॉ. वा. ना. कुबेर



**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.